रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २०६
www.ramprahar.com
सोमवार, १२ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'अयोध्येप्रमाणे मथुरेतही लवकरच श्रीकृष्ण मंदिर निर्माण होणार'/२
रायगड महासंस्कृती महोत्सवाचे आज अलिबागमध्ये उद्घाटन/५
रायगडच्या तायक्वांदो खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेत ११ पदके/८

## गावांमधील ३७ हजार किमीचे रस्ते होणार नवे



**मुंबई** : राज्यात ३७ हजार किमीचे ग्रामीण रस्ते बांधण्याची मोठी योजना महायुती सरकार राबविणार आहे. त्यातील ३० हजार किमीचे रस्ते हे हायब्रीड न्युटीनुसार व सात हजार किमीचे सिमेंट रस्ते बांधले जाणार आहेत. ग्रामविकास विभागाने याबाबतची योजना आखली आहे. ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग मिळून दोन लाख ९७ हजार किमी लांबीचे रस्ते हे ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीत येतात. पंतप्रधान ग्रामीण रस्ते विकास योजनेच्या पहिल्या टप्प्यात त्यातील ३२ हजार किमीचे रस्ते बांधण्यात आले होते. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतानाच्या काळात ३० हजार किमीचे रस्ते बांधणे सुरू झाले. आणखी सात हजार किमीचे रस्ते बांधण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी लवकरच येणार आहे.

# महाराष्ट्र अनुभवतोय ऋतूबदल

## विदर्भात गारपीट, अनेक ठिकाणी उन्हाचा कडाका, तर सकाळी थंडी





**पुणे : प्रतिनिधी**

राज्यामध्ये तापमानात वाढ होत असून, त्यामुळे अनेक ठिकाणी पावसासाठी पोषक हवामान तयार झाले आहे. रविवारी विदर्भातील अनेक ठिकाणी विजांसह पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला होता. पावसाने अमरावती भागात रविवारी धुमाकूळ घातला. गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. अमरावतीसह यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यांत हा पाऊस झाला आहे. याउलट राज्याच्या अनेक भागात दिवसभर उन्हाचे चटके तर रात्री थंडी जाणवत आहे.

सध्या राज्यामध्ये किमान–कमाल तापमानात चढ–उतार होत आहे. गारठा कमी झाला असून, उष्णता जाणवत आहे. येत्या काही दिवसांमध्ये राज्यात तापमानातील वाढ कायम राहणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. शनिवारी पुण्यात राज्यातील सर्वांत कमी किमान तापमान आणि सर्वाधिक कमाल तापमान नोंदवले होते. रविवारी दुपारी मात्र उन्हाचा कडाका चांगलाच जाणवला. रायगडातही सध्या दिवसभर उन्हाचे चटके तर रात्री थंडी जाणवत आहे.

सातत्याने होणाऱ्या हवामान बदलामुळे यंदा हापूस आंब्याच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. या हवामानामुळे आंब्यावर रोग पडत आहे. याचा मोठा फटका आंबा पिकाला बसत आहे. त्यामुळे कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत.

दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवस राज्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

# पनवेल खानावळेतील ठाकरे गटाचे कार्यकर्ते भाजपमध्ये

## आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून खानावळे ग्रामपंचायतीच्या ठाकरे गटाचे विद्यमान सरपंच जयश्री सुभाष नाईक यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार महेश बालदी यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, **(पान २ वर..)**

# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये स्नेहसंमेलन

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती; विद्यार्थ्यांचा गौरव




**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या दुसऱ्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (दि.१०) झाला. निखरता भारत या शीर्षकाखाली हा स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

स्नेहसंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्रजी माध्यम आणि कनिष्ठ




महाविद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. या वेळी कला, क्रीडा, वक्तृत्व आणि शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या वेळी 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, मुंबई उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय उपसचिव अशोक मांडे, संस्थेचे रायगड विभाग निरीक्षक रोहिदास ठाकूर, रायगड विभाग उपनिरीक्षक शहाजी फडतरे, भाजप ओबोसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, कामोठे लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल शाळा समिती सदस्य आशा भगत, कामोठे लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्यु. कॉलेज प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, माजी नगरसेवक अरुणकुमार भगत, फातिमा मुल्ला, गव्हाण शिवाजी शाळा मुख्याध्यापक घोडके सर, **(पान २ वर..)**

# ब्रेक फेलमुळे ट्रक दरीत कोसळला

## एक ठार, एक जखमी



**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील खोपोली बायपासजवळ ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने ट्रक थेट २० फूट दरीत कोसळला. या अपघातात ट्रकचालकाने उडी मारल्याने तो बचावला असला, तरी गंभीर जखमी झाला आहे, तर क्लिनर ट्रकमध्येच अडकल्याने त्याचा मृत्यू झाला.

ट्रकचालक श्रीमंत नवणे (वय ४६, रा. उमनाबाद जि. बिदर कर्नाटक) हा कर्नाटक ते अंबरनाथ असा जात असताना खोपोली एक्झिटदरम्यान ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. प्रथम चालकाने ट्रकमधून खाली उडी मारली. ट्रक रस्त्याच्या बाजूला असलेल्या लोखंडी रेलिंग तोडून, सिमेंट भिंतीला जोरात धडक मारून बाजूला असलेल्या २० फूट दरीत उलटला. चालकाने ट्रकमधून खाली उडी मारल्याने त्याच्या कंबरेला व पायाला गंभीर दुखापत झाल्याने कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तसेच क्लिनर ट्रकमध्ये अडकल्याने जागीच ठार झाला.

या घटनेने अर्धा तास वाहतूक ठप्प झाली होती. महामार्ग बोरघाट पोलीस उपनिरीक्षक गजानन म्हात्रे यांनी वाहतूक कोंडी दूर करून जखमीला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

### बोरघाटात बाईक रायडरचाही मृत्यू

बाईकस्वार मुंबई ते कल्याण असा जात असताना अतिवेगात नियंत्रण सुटल्याने दुचाकी कडेला कोसळून समृद्ध सुभाष बेलोसे (२५, श्री पाटीदार पार्क रेती बंदर रोड, कल्याण) हा ठार झाला. विशेष म्हणजे रायडरने सर्व संरक्षक साहित्य वापरूनही गंभीर इजा झाली व रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी त्याचा मृत्यू झाला. हा अपघात खोपोली मिळठाकूर वाडी येथे रविवारी (दि. ११) सकाळी ११.३० वा. सुमारास घडला.

# महाराष्ट्र ही शौर्य आणि पराक्रमाची भूमी

## सीएम आदित्यनाथ यांचे गौरवोद्गार

**आळंदी : प्रतिनिधी**

महाराष्ट्र ही शौर्य आणि पराक्रमाची भूमी आहे कारण इथे संतांचे सान्निध्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची ख्याती सर्वांना सर्वश्रुत आहे, असे गौरवोद्गार उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी व्यक्त केले.

तीर्थक्षेत्र आळंदीत परमपूज्य गोविंददेव गिरी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित महोत्सवात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, मला आळंदी भूमीत येण्याचे सौभाग्य लाभले. अगदी लहान होतो तेव्हा ज्ञानेश्वर महाराज यांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी वाचली. तेव्हापासून आळंदीत येण्याची इच्छा होती. आज ती पूर्ण झाली आहे.



**पनवेल, बारामती : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची पुतणी प्राप्ती राज ठाकूर या वयाच्या २२व्या वर्षी कमर्शियल पायलट झाल्या आहेत. त्यांचे पनवेल येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर (काका), शकुंतला रामशेठ ठाकूर (काकू), अमोघ ठाकूर यांनी अभिनंदन केले, तर बारामती येथे आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्रतिक ठाकूर, स्वप्नील ठाकूर (सर्व भाऊ), राज ठाकूर (पती), अमोघ ठाकूर आदींसह मित्रपरिवाराने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.** (वृत्त ३ वर..)





# महासंस्कृती महोत्सवामुळे कलावंतांना हक्काचे व्यासपीठ -मुख्यमंत्री शिंदे

**पालघर : प्रतिनिधी**

एकिकडे विकास साधला जात असतानाच आपल्या संस्कृतीशी आपले नाते अधिक घट्ट व्हावे, स्थानिक कलावंतांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन राज्यात करण्यात आल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. सिडको मैदान येथे आयोजित महासंस्कृती मोहत्सव कार्यक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्या वेळी ते बोलत होते.



या वेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण, जि. प. अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, आमदार रविंद्र फाटक, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शासन आपल्या दारी अभियानाच्या माध्यमातून राज्यामध्ये दोन कोटी ६० लाख नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला आहे. महिलांना सवलतीच्या दरात राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये प्रवास सुरू करण्यात आला. महिला सक्षमीकरण, लेक लाडकी, नमो शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना १२ हजार रुपयाचे अनुदान देण्यात येते. शेतकऱ्यांना एका रुपयात पीक विमा देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. बंद असलेले सिंचनाचे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. असे अनेक लोकहिताचे निर्णय या शासनाने घेतले. हा सर्व विकास साधला जात असताना आपल्या संस्कृतीशी आपले नाते अधिक घट्ट व्हावे, यासाठी महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन राज्यात करण्यात आले आहे.

पालकमंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५०व्या राज्यभिषेक वर्षानिमित्त तसेच त्यांच्या जीवनावर आधारीत त्यांचे विचार महानाट्याद्वारे जिल्ह्यातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी महानाट्याचे आयोजन तसेच राज्यातील विविध प्रांतातील संस्कृतीचे अदान, प्रदान, स्थानिक कलाकारांसाठी हक्काचे व्यासपीठ, कला व संस्कृतीचे जतन संवर्धन आणि स्वातंत्र्य लढ्यातील ज्ञात, अज्ञात क्रांतीवीरांच्या शौर्यगाथा जिल्ह्यातील नागरीकापर्यंत पोहचविण्यासाठी महासंस्कृती महोत्सव व महानाटचाचे आयोजन करण्यात आले आहे.

# अयोध्येप्रमाणे मथुरेत लवकरच श्रीकृष्ण मंदिर निर्माण होणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला विश्वास

**आळंदी : प्रतिनिधी**

अयोध्या, काशी आणि मथुरा ही पवित्र ठिकाणे आहेत. ज्या पद्धतीने श्रीराम जन्मभूमीचा प्रश्न मार्गी लागला, त्याचप्रमाणे कायदेशीररीत्या मथुरा येथील श्रीकृष्ण मंदिरदेखील निर्माण होईल, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आळंदीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. त्यांनी गीत-भक्ती अमृत महोत्सव कार्यक्रमाला हजेरी लावली.



उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अयोध्या, काशी आणि मथुरा ही ठिकाणे अत्यंत पवित्र आहेत. ज्या पद्धतीने राम जन्मभूमी निर्माण झाली, त्या पद्धतीने मथुरा येथे कृष्ण मंदिर निर्माण व्हावे ही लोकांची अपेक्षा आहे. मला विश्वास आहे, ज्या पद्धतीने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करीत राम मंदिर निर्माण झाले. त्याच पद्धतीने श्रीकृष्ण मंदिर सौहार्दपूर्ण वातावरणात निर्माण होईल, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते वारकरी शिक्षण संस्थेच्या 'बंकटस्वामी सदन' या विद्यार्थी वसतीगृहाचे लोकार्पण करण्यात आले. वारकरी शिक्षण संस्थेतील सुमारे ५०० विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेकरीता पाच कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी केली. कार्यक्रमाला वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, संजय राऊत सातत्याने करीत असलेल्या टीकेला त्यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. कोण संजय राऊत? ते काय मोठे नेते आहेत का? मोठे नेते असतील तर मला विचारा अशा शब्दांत त्यांनी राऊत यांच्यावर टीका केली. आचार्य प्रमोद कृष्णम यांना काँग्रेसने निलंबित केल्याच्या मुद्द्यावरही त्यांनी काँग्रेसवर टीका केली. त्यांचा दोष येवढाच आहे की त्यांनी काँग्रेसला सांगितले की राम आणि राम मंदिराला विरोध करू नका. त्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई झाल्याचे फडणवीस म्हणाले.

# पोलादपूर चरईनजिक आज विठ्ठलमूर्ती आणि संगीत विद्यालयाचे भूमिपूजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाला जुन्या महाबळेश्वर रस्त्यापासून काही अंतरावर चरई गावाच्या हद्दीतील शेतजमिनीवर सोमवारी (दि. १२) सकाळी ११ वाजता ६१ फुटी श्रीविठ्ठलमूर्ती आणि संगीत विद्यालयाचेही भूमिपूजन होणार असून याप्रसंगी तालुक्यातील सर्व वारकरी सांप्रदायप्रमुखांची उपस्थिती लाभणार आहे. या वेळी राजकीय नेत्यांच्या उपस्थितीची माहितीही आयोजकांनी दिली आहे.

या दुहेरी सोहळ्यावेळी रामदादामहाराज घाडगे, दादामहाराज मोरे, अरविंदनाथ महाराज, हरिश्चंद्र मोरे महाराज, ढवळेबाबा वारकरी सांप्रदाय, विठ्ठलआण्णा घाडगे,हरिभाऊ रिंगे महाराज, लक्ष्मण महाराज मालुसरे, किर्तनकार केशवमहाराज मोरे आदी सांप्रदायप्रमुख आध्यात्मिक मांदियाळी उपस्थित राहणार असल्याचे ६१ फुटी श्रीविठ्ठलमुर्ती आणि संगीत विद्यालयाचे संकल्पनाकार बंडाराजजी घाडगे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे सांगितले आहे.

या वेळी आमदार भरत गोगावले, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार प्रवीण दरेकर, चंद्रकांत कळंबे, अक्षय महाराज मोरे, लालसिंह पुरोहित, राजन निकम, शेखरदादा शेरे, राज पार्टे, मंगेशभाऊ पांगारे, निशाताई परूळेकर, निलेश अहिरे, लक्ष्मण मोरे, रामदास कळंबे, शिरिष साबळे, वैभव चांदे, ज्ञानोबा मालुसरे, अरविंद साळुंखे, भगवान महाराज कोकरे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार असल्याचे निमंत्रक चंद्रकांत घाडगे, हरिश घाडगे, हरिओम घाडगे, गोपीचंद घाडगे आदींनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त चित्रकला स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेनेचे मुखयनेते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ह्यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल शहर शिवसेनेच्या प्रभाग १४ अंतर्गत कुंभारवाडा येथे चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



या स्पर्धेत परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, होतकरू विद्यार्थी यांनी त्यानिमित्ताने एकत्र यावे या उद्देशाने प्रभाग क्रमांक १४ चे विभाग प्रमुख ॲड. आशिष पनवेलकर यांच्या संकल्पनेतून चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शिवसेनेचे महानगरप्रमुख तथा माजी नगरसेवक ड प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या हस्ते व शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, शहर संघटक अभिजीत साखरे, उपशहर प्रमुख मच्छिंद्र झगडे उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

आशिष पनवेलकर यांच्यासह हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभाग क्रमांक १४ कुंभारवाडा मधील विभाग प्रमुख आशिष पनवेलकर, तसेच शाखाप्रमुख किरण कळवेकर, उप शाखाप्रमुख प्रतिक वाजेकर, युवासेना शाखा प्रमुख ओंकार पनवेलकर, अनिकेत जैस्वाल,रसूल बागवान, उपशहर वैद्यकीय कक्ष हितेंद्र पेडामकर शिवसैनिक दैवत पनवेलकर, शिवसैनिक नरेंद्र पनवेलकर या पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या बाळासाहेबांच्या सूत्रानुसार कुंभारवाडा व प्रभाग क्रमांक १४ शिवसेनेची वाटचाल सुरू असल्याचे यावेळेस सोमण यांनी सांगितले. तर स्थानिक कुंभार समाजाचे पंच दिलीप पनवेलकर, कल्याणकर यांनीदेखील शिवसेनेचे आभार मानले.

# बोरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाच्या वतीने माणगाव तालुक्यातील श्रीमती एस.केभाटे विद्यालय बोरवाडी येथे शनिवारी (दि. १०) हुशार, होतकरु, गरजू, क्रीडा क्षेत्रात आवड असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

सार्वजनिक उत्सव मंडळाचे पदाधिकारी अमिताभ दशरथ मेस्त्री (कोषाध्यक्ष), शशिकांत जाधव (माजी मानद सचिव), महेश पेडणेकर (माजी मानद सचिव), मनोज राणे यांचे प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. विद्यालयाचे मुख्याध्यापक कुशिरे सर यांनी विद्यालयाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत केले. विद्यालयातील शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजीएट चित्रकला ग्रेड परीक्षा व एन.एम.एम.एस.राष्ट्रीय स्पर्धा परीक्षेत, विज्ञान व क्रीडा क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवर व संस्थेचे पदाधिकारी यांचे हस्ते विषेश सत्कार करण्यात आला.

व्यासपीठावर मानगड परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नितीन पवार, कार्यवाह संतोष रणपिसे, शाळा समिती चेअरमन संतोष पवार व शिरसाड ग्रामपंचायतीचे प्रथम नागरिक सरपंच प्रमोद खेतम उपस्थित होते. शिक्षणप्रेमी गोपीचंद रणपिसे यांचे विशेष प्रयत्नातून व कार्यवाह संतोष रणपिसे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे वरील मदत विद्यालयास उपलब्ध झाली. विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक तुषार बगडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# प्रजापती समाज विकास मंडळातर्फे श्रीयादे माताची जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिरोमणी, निसर्ग रक्षक, प्राणी दयाळू, भक्त प्रल्हादांचे गुरू आणि प्रजापती कुंभार समाजाचे आराध्य दैवत, संत शिरोमणी संतश्री श्रीयादे माताजीची जयंती रविवारी (दि. ११) प्रजापती समाज विकास मंडळ यांच्या वतीने पनवेलमध्ये साजरी करण्यात आली.

उपस्थित मान्यवरांनी श्रीयादे माताजींच्या भक्तिकथेवर प्रकाश टाकला आणि त्यांच्या भक्तीची प्रशंसा केली. मानवी समाजाच्या कल्याणासाठी आणि उन्नतीसाठी उपयुक्त असलेल्या त्यांच्या शिकवणींचे वर्णन केले. या वेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सी.पी.प्रजापती, राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस विनोदकुमार प्रजापती, राष्ट्रीय सरचिटणीस गजेंद्र प्रजापती, राष्ट्रीय संघटन सचिव डॉ. ज्ञानप्रकाश प्रजापती, पनवेल महापालिकेचे युवा अध्यक्ष विशाल जोगेंद्र प्रजापती, डॉ. उपसचिव रोहित राजेंद्र प्रजापती, कार्यकारिणी सदस्य राकेशकुमार प्रजापती, संजय पन्नालाल प्रजापती आदी उपस्थित होते.



# रसायनीकरांकडून किनाऱ्याची साफसफाई

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट रसायनी आणि पिल्लई एचओसी कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय मोहोपाडा रसायनी यांचा संयुक्त विद्यमानाने अलिबाग येथील वरसोली समुद्र किनारावर समुद्र देवतेची पूजा करून समुद्र किनारा साफसफाई करण्यात आला.



यासोबतच नदी नाळे समुद्र किनारे यांचावर मोठ्या प्रमाणात प्लास्टिक बॉटल, कचरा साचलेला आहे. त्यांचे नैसर्गिक सौंदर्य अबाधित राहावे यासाठी सफाई करणे काळाची गरज आहे, हे जाणून आम्ही रविवारी (दि. ११) साफसफाई सुरुवात करुन समुद्रकिनाऱ्यावर साचलेला कचरा एकत्रित करुन त्याची योग्यप्रकारे विल्हेवाटही लावण्यात आली.

या वेळी उपस्थित अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, अमित पाटील, निलेश जाधव, कळवती उपाध्याय शिक्षिका, यश खंडेलवाल, कृष्णा मिश्रा, हर्ष पाटील, सुयश तांबडे, वैष्णवी खानविलकर आदी सोबत रसायनीतील राष्ट्रीय सेवा योजनांमधील असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# जयदास घरत यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा वडघर मराठी येथे नुकत्याच झालेल्या शाळेच्या ५०व्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनाचे आयोजन शाळेचे आजी माजी विद्यार्थी संघ, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य स्वरूपात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमात शाळेसाठी भरीव कामगिरी करणारे सुसंस्कारित व गुणवंत विद्यार्थी घडविण्यासाठी मेहनत करणारे, समाजाशी शाळेच्या कामासाठी सतत संपर्कात राहणारे उत्तम शैक्षणिक कार्य करणारे जयदास बाबुराव घरत यांना पनवेल पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सीताराम मोहिते, श्रीवर्धन गटशिक्षणाधिकारी नवनाथ साबळे सुरेश जोशी केंद्रप्रमुख म. रा.प्रा.शिक्षक संघ रायगड अध्यक्ष डॉ. सुभाष भोपी, तालुका अध्यक्ष प्रभाकर घरत, उरण पतपेढी चेअरमन डॉ. प्रशांत पाटील, अभिजित मटकर कनिष्ठ अभियंता समग्र शिक्षा अभियान, यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या वेळी अध्यक्ष चंद्रकांत कांबळे, मोहन गायकवाड अध्यक्ष, मुख्याध्यापक प्रफुल्ल थले, रायगड जिल्हा पोलीस पाटील संघ करंजाडे पोलीस पाटील सचिव कुणाल लोंढे, भरत सोनवणे, प्रवीण जाधव, अनिल भातांकर, संतोष सोनवणे, महेश साळुंखे, सोनू साळुंखे, अनंत कांबळे, कुणाल कांबळे व विविध महिला मंडळाच्या अध्यक्षा आदी मान्यवर, शिक्षक वृंद, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# गाढी नदीच्या पात्रात आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरा जवळील तक्का परिसरातील आमराई येथील दर्ग्याजवळील गाढी नदीच्या पात्रात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करत आहे.

या व्यक्तीचे वय ३० ते ३५ वर्ष, रंग सावळा, अंगात काळा टीशर्ट व नेव्ही ब्लु हाफ पॅन्ट तसेच कमरेस काळा करगोटा आहे. केस काळे व दाढी वाढलेली आहे या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा. पोलीस निरीक्षक सुषमा पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## पनवेल खानावळेतील ठाकरे गटाचे कार्यक्रर्ते भाजपत

पनवेल माजी उपसभापती देविदास पाटील, खानावळे ग्रामपंचायत सदस्य गणेश आगिवले, महेंद्र पाटील, युवा कार्यकर्ता गणेश पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी सरपंच जयश्री सुभाष नाईक यांच्यासह गोपाळ नाईक, कमलाकर कातकरी, अनिल सवार, सुनील कातकरी, रमेश कातकरी, संजय नाईक, मुक्ता सवार, काळुबाई कातकरी, सुनीता नाईक, माणिक नाईक, सुंदर कातकरी, हरिभाऊ नाईक यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

## लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये स्नेहसंमेलन

मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, रयत शिक्षण संस्था रायगड विभाग वरिष्ठ लिपिक गुजर सर, विश्वनाथ कोळी, सुषमा पाटील विद्यालय प्राचार्य मंदार सर, विकास घरत, हॅप्पी सिंग, वर्षा प्रशांत ठाकूर, सीनियर संयोजक सोनाली पवार, स्वाती बालस्कर, प्राथमिक समन्वयक अर्चना माथूर यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक आणि पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण आविष्कारांचे सादरीकरण केले.

# करंजा बंदराचे काम प्रगतीपथावर

**उरण : रामप्रहर वृत्त**

करंजा कोकणातील मच्छीमारांना वरदान ठरणाऱ्या करंजा बंदराच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. बंदरातील सुविधांसाठी दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर पुढील काम सुरू होणार आहे.



मुंबईतील ससून बंदराला पर्याय म्हणून हे नवीन बंदर केंद्र व राज्य सरकारच्या भागीदारीतून उभारले जात आहे. मात्र मागील अकरा वर्षांपासून या बंदराचे काम अत्यंत धिम्या गतीने रखडत रखडत सुरू आहे. केंद्र-राज्य सरकारच्या निम्म्या निम्म्या भागीदारीच्या फॉर्म्युल्यावर सुरू असलेल्या बंदराचे काम अपुऱ्या निधीअभावी अपूर्ण राहिले आहे. २०१२ साली करंजा बंदराचे काम सुरू करण्यात आले. हे काम ६४ कोटींवरून १५० कोटींपर्यंत पोहचले आहे. अतिरिक्त खर्चाचा निधी शासनाकडून उपलब्ध होणार आहे. बंदरात साचलेला गाळ काढणे, स्वच्छतागृह उभारणे, बंदराशी जोडणाऱ्या रस्त्यांची कामे बाकी आहेत. त्यासाठी आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने मत्स्यव्यवसाय मंत्रालयाने अधिकचा निधीही उपलब्ध करून दिला आहे.

या मासेमारी बंदरामुळे परिसरातील २५ हजार नागरिक, व्यावसायिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मच्छीमारांचेही भाग्य उजळणार असल्याने या बंदराची तयार होण्याची प्रतीक्षा आहे. करंजा मच्छीमार बंदर हे रायगड आणि कोकणातील मच्छीमारांना फायद्याचे ठरणार आहे.

येथील मच्छीमारांना आपल्या मासळीची विक्री करण्यासाठी दूरच्या बंदरात जाण्याची गरज लागणार नाही.

# अयोध्येत जाणाऱ्या रामभक्तांना पनवेल रेल्वेस्थानकात शुभेच्छा







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

५०० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर भगवान श्री राम त्यांच्या भव्यदिव्य मंदिरात विराजमान झाले आहेत. त्यामुळे देशभरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. देशभरातील नागरीक या मंदिराला भेट देऊन प्रभू श्रीरामांचे दर्शन घेत आहेत. त्यापार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने मावळ लोकसभा मतदारसंघामधील सहकारी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड येथुन आयोध्येत जाणारी रेल्वे शनिवारी (दि. १०) रात्री पनवेल स्थानकावर वरुन निघाली. या वेळी सर्व श्रीराम भक्तांना भारतीय जनता पक्ष पनवेल यांच्या वतीने पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच जेवण आणि पाणी देण्यात आले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी आमदार सुरेश लाड, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष मयुरेश नेतकर, महिला जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, पनवेल शहर महिला अध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, वर्षा प्रशांत ठाकूर, स्वाती अविनाश कोळी, भीमराव पोवार यांच्यासह मान्यवर आणि रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### पनवेलमध्ये आढळला एकाचा मृतदेह

**पनवेल :** शहरातील हुंडाई वर्कशॉप जवळ एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. या व्यक्तीचे वय २२ ते २५ वर्षे, रंग सावळा, उंची पाच फुट पाच इंच, सडपातळ बांधा, डोक्याचे केस काळे लहान, दाढी छोटी तुरळक, अंगाने सडपातळ आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे दुरध्वनी (२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक एस.डब्ल्यू.वायकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा आनंदोत्सव

**पनवेल :** निवडणूक आयोगाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्ष हाच खरा राष्ट्रवादी कॉंग्रेस असून पक्षाचे चिन्ह घड्याळ बहाल केल्याबद्दल पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष महादेव पाटील यांच्या उपस्थितीत कळंबोली येथील पक्षाच्या कार्यालयात मोठ्या उत्साहात पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अल्पसंख्यांक विभाग महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस डॉ. मुनीर तांबोळी, डॉ श्रेयस ठाकूर, पंकज शहा, सुरेश पानमंद, शहाजी पाटील, वैजनाथ मोरे, दिलीप लंबाते व असंख्य राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.






पनवेल : पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, चिखले ग्रामपंचायतीचे माजी सदस्य राम फडके, गजानन जोशी, प्रल्हाद भोईर, सतिश भोईर, सुनील भोईर आदी उपस्थित होते. पंडित दीनदयाळ यांनी शास्त्रे, धर्मग्रंथ, आणि तात्त्विक ग्रंथांच्या चिंतनातून व मननातून त्यांनी एकात्ममानववाद हा सिद्धांत मांडला व भारतीय समाजापुढे ठेवला होता.

## नवीन पनवेलमध्ये माघी गणेश जयंतीनिमित्त किर्तन

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल मध्ये माघी गणेश जयंती उत्सवा निमित्त प्रथमच महिला किर्तनकार हभप सरिताताई गोळेगावकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. मंगळवारी (दि.१३) नवीन पनवेलमध्ये अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघा तर्फे माघी गणेश जयंती उत्सव साजरा केला जाणार आहे.

सायंकाळी ६ वाजता महिला किर्तनकार हभप सरिताताई गोळेगावकर (एमए, बीएड) यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन अश्वत्थामाचे अध्यक्ष प्रकाश विचारे यांनी केला आहे.

## डॉ. कृष्णा देसाई यांची सहसंयोजकपदी नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारतीय जनता पक्ष वैद्यकीय आघाडी महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने प्रदेश कार्यकारणी आयुर्वेद विभाग सहसंयोजकपदी पनवेलमधील डॉ. कृष्णा देसाई यांची प्रदेश सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल त्यांचे भाजप मावळ लोकसभा निवडणूकप्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, रायगड जिल्हा डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अरुणकुमार भगत आदी नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी डॉ. कृष्णा देसाई यांचे अभिनंदन केले आहे.

## बारामती येथे प्राप्ती ठाकूर यांचा कमर्शियल पायलट पदवीदान समारंभ









**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची पुतणी प्राप्ती राज ठाकूर या वयाच्या २२व्या वर्षी कमर्शियल पायलट झाल्या आहे. रायगड जिल्ह्यातील आगरी समाजातील पहिली महिला पायलट होण्याचा मान प्राप्ती ठाकूर यांनी मिळविला आहे. रविवारी (दि. ११) बारामती येथे त्याचा थ्री स्ट्रीप्स व इप्युलेट (पदवीदान) समारंभ झाला.

बारामती येथील कार्व्हर एव्हिएशन अकॅडमी येथे झालेल्या या समारंभाला आमदार प्रशांत ठाकूर, भरतशेठ ठाकूर, पनवेल मनपाचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्रतिक ठाकूर, स्वप्नील ठाकूर, दीपक ठाकूर, विलास ठाकूर, संजय पाटील, राज ठाकूर, मानस ठाकूर, रोशन पाटील, राज पाटील, विक्रांत म्हसकर, ऋषीकेश ठाकूर, सागर ठाकूर, योगिता ठाकूर, रजनी ठाकूर, अनिता ठाकूर, अर्चना ठाकूर, अमोघ ठाकूर आणि संपूर्ण ठाकूर परिवार उपस्थित होता. या वेळी सर्वांनी प्राप्ती यांचे कौतुक केले.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये पालक-शिक्षक सभा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १०) सकाळी ९ वाजता पालक - शिक्षक समितीतर्फे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पालक -शिक्षक सभेचे आयोजन केले होते.

या पालक- शिक्षक सभेसाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे सुमारे १२० पालकांनी उपस्थित राहून त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक विकास, वर्गामध्ये असणारी उपस्थिती तसेच वेगवेगळ्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग याविषयी वर्गशिक्षकांशी संवाद साधला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेण्यात येणारे वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम, अभ्यासक्रम, करियर गायडन्स सत्रे तसेच, प्लेसमेंट ड्राईव्ह, मूल्यमापन पद्धती तसेच महाविद्यालयात घेण्यात येणारे आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व पालकांच्या शंकांचे निरसन केले.

या पालक शिक्षक सभेचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. तनुजा सुमन यांनी केले तसेच, प्रा. डॉ. महेश्री झिरपे समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, प्रा. डॉ. रीत ठुले प्रा. विशाल देशमुख, प्रा. स्नेहा लोखंडे, प्रा. प्रवर शर्मा हे सर्व विभाग प्रमुख तसेच पालक - शिक्षक समितीतील इतर सर्व सदस्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## नेरे येथे हळदीकुंकू समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मकरसंक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत हळदीकुंकवाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. याअंतर्गत तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नेरे येथील त्यांच्या निवासस्थानी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन शनिवारी (दि. १०) करण्यात आले होते.

या वेळी उत्तर रायगड सरचिटणीस चारुशिला घरत, उत्तर रायगड सरचिटणीस महिला मोर्चा संध्या शारबिद्रे, रायगड चिटणीस महिला मोर्चा शिल्पा म्हात्रे, पनवेल तालुका महिला मोर्चा तालुकाध्यक्ष नीता चोरणकर, नेरे उपसरपंच निलीमा पाटील, सामाजिक कार्यकर्त्या छाया पाटील, संगीता जोशी, माजी सरपंच राजश्री म्हसकर, सावित्री पाटील, गौरी मानकामे, सुवर्णा मगर आदी उपस्थित होते.

दरम्यान, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे यांच्या घरीही हळदीकुंकू आयोजित केले होते. या वेळी वर्षा प्रशांत ठाकूर उपस्थित होत्या.









पनवेल : तालुक्यातील कानपोली येथे श्री महागणपती प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर जिल्हा ओबीसी मोर्चा सरचिटणीस दशरथ म्हात्रे व अन्य पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## संपादकीय

# ‘सीएए’ आणि गैरसमज

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीएए अर्थात नागरिकत्व दुरूस्ती कायदा देशात लागू करण्याबाबत घोषणा केली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी हा कायदा लागू करण्याची अधिसूचना जारी करून कायदा लागू करण्यात येईल, असे शाहांनी स्पष्ट केले. दरम्यान, हा कायदा म्हणजे अल्पसंख्याकांना विशेषतः मुस्लिमांना मुख्य प्रवाहातून बाजूला सारण्याचा प्रयत्न असल्याचा विरोधकांचा आरोप आहे, मात्र त्यांनी आधी हा कायदा समजून घेतला पाहिजे.

**नागरिकत्व दुरूस्ती कायद्यांतर्गत बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानातील सहा धार्मिक अल्पसंख्याकांना (हिंदू, बौद्ध, जैन, पारशी, ख्रिश्चन आणि शीख) भारताचे नागरिकत्व देण्याचा प्रस्ताव आहे. सद्यस्थितीत भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठी कुठल्याही व्यक्तीला भारतात किमान ११ वर्षे राहणे आवश्यक असते. या कायद्यामुळे आता ही अट शिथिल होऊन सहा वर्षांवर आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ११ डिसेंबर २०१९मध्ये राज्यसभेत सीएए विधेयक मंजूर करून घेतले होते. हे विधेयक लोकसभेतही मंजूर झालेले आहे. अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तान या देशांमध्ये अल्पसंख्याक म्हणजे हिंदू आणि शीख नागरिकांवर अत्याचार होतात. त्यामुळे तेथील लाखो लोक भारतात दाखल झालेले आहेत. त्या सगळ्यांना नागरिकत्व देण्यासाठीचा हा सीएए कायदा आहे. धार्मिक छळामुळे ज्या अल्पसंख्याकांना या देशातून पळ काढावा लागला आहे. त्यांना या कायद्यामुळे भारतात नागरिकत्व मिळेल, असे सरकारने म्हटले आहे. नागरिकत्व कायदा १९५५ हा भारतीय नागरिकत्वासंबंधीचा एक सर्वसमावेशक कायदा आहे, ज्यात भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठीच्या अटींची माहिती देण्यात आली आहे. या कायद्यात आतापर्यंत १९८६, १९९२, २००३, २००५ आणि २०१५ अशी पाच वेळा दुरूस्ती करण्यात आली आहे. कुठलीही व्यक्ती आपले भारतीय नागरिकत्व या तीन प्रकारे गमावू शकते. जेव्हा कुणी स्वेच्छेने नागरिकत्वाचा त्याग करण्यास इच्छुक असेल. जेव्हा कुणी दुसऱ्या राष्ट्राचे नागरिकत्व स्वीकारते. जेव्हा सरकार कुणाचे नागरिकत्व रद्द करते. मोदी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात दुरूस्ती विधेयक जेव्हा मांडण्यात आले होते तेव्हा त्यात पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानातील हिंदू, जैन, पारशी, आणि शीख यासारख्या हिंदूएतर धर्मांच्या लोकांना नागरिकत्व देण्याची तरतूद होती. हे विधेयक लोकसभेत संमत झाले, पण त्यानंतर राज्यसभेत ते अडकले. त्यानंतर सार्वत्रिक निवडणुका झाल्या. कुठलेही विधेयक एका सरकारच्या कार्यकाळात संसदेच्या दोन्ही सभागृहात संमत होऊन राष्ट्रपतींकडे पाठवले जाते. त्यामुळे ते पुन्हा राज्यसभेत मांडले गेले आणि अखेर ते राज्यसभेत संमत झाले. त्यानंतर राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीनंतर त्याला कायद्याचे अधिकृत रूप मिळाले. याबाबत बोलताना गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीतील ईटी नाऊ ग्लोबल बिझनेस समिटमध्ये बोलताना स्पष्ट केले की, सीएए लागू केल्याने कोणत्याही व्यक्तीची नागरिकता काढून घेतली जाणार नाही. याचा उद्देश फक्त धार्मिक छळाचा सामना करीत असलेल्या पाकिस्तानी, अफगाणिस्तानी आणि बांगलादेशी अल्पसंख्याकांना नागरिकत्व देणे हा आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी सीएए लागू करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे चालू महिन्यात किंवा मार्च महिन्याच्या सुरुवातीला हा कायदा लागू होण्याची शक्यता आहे.**

# पर्यावरण संतुलनासाठी पाणथळ जागांचे संवर्धन आवश्यक

जागतिक पाणथळ दिन म्हणून २ फेब्रुवारी हा दिवस नुकताच साजरा करण्यात आला. पर्यावरणासाठी, त्याच्या संतुलनासाठी पाणथळ जागांचे महत्त्व मोठे आहे. पाणथळ प्रदेशांचे संवर्धन आणि व्यवस्थापनासाठी केंद्र सरकार आणि राज्य शासन अनेक पावले उचलत आहेत. त्यामुळे या जागांचे पर्यावरणीय स्वरूप जतन केले जात आहे. राज्यातील अनेक जागा या रामसर परिषदेच्या निकषांनुसार पात्र ठरतात. अर्थात, अशा आंतरराष्ट्रीय मानकांनुसार रामसर स्थळ म्हणून घोषित होणे पुरेसे नाही. त्यानंतर त्या वारसा स्थळांचा दर्जा टिकवून ठेवणे, त्यांचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे. रामसर स्थळांचे जतन आणि संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकांचे ते कर्तव्य आहे. वैयक्तिक पातळीवर त्याचे जतन करणे, किमान त्यांना आपण हानी पोहचवणार नाही याकडे लक्ष देणे, प्रबोधन या माध्यमातून ही जागरुकता येऊ शकेल!

निसर्गात अतिशय वैविध्यपूर्ण जागा आहेत. जसे त्यात डोंगर, दऱ्या, नद्या आहेत तसेच पाणथळ जमिनी आहेत. आपण दलदल म्हणू शकतो. इंग्रजीमध्ये त्यांना वेटलॅन्ड्स असे म्हणतात. पाणथळ जागांच्या संवर्धनासाठी आणि जतनासाठी जागतिकस्तरावर प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून इराणमधील रामसर शहरात १९७१मध्ये एक जागतिक परिषद आयोजित करण्यात आली. त्यात प्रामुख्याने या जागांचे संरक्षण आणि संवर्धन असे विषय हाताळले गेले. या परिषदेपासून पाणथळ जागांना रामसर (जागा) स्थळे म्हणून संबोधले जाऊ लागले. आंतरराष्ट्रीय स्तरावर या परिषदेतील ठराव सन १९०५पासून अमलात आला, तर भारतात १९८५पासून त्याची अंमलबजावणी चालू झाली.

रामसर ठरावानुसार तलाव, नद्या, दऱ्या, दलदली आणि त्यातील गवताळ प्रदेश खारफुटीची वने, वाळवंटातील हिरवळीचे प्रदेश, प्रवाळ बेटे अशा नैसर्गिक जागा आणि मत्सशेतीची तळी, भातशेती, धरणांचे जलाशय, मिठागरे अशा मानवनिर्मित जागांचा समावेश होतो. ठरावाला मान्यता दिलेल्या देशांना किमान एका जागेचा समावेश यात करावा लागतो. जगभरात सुमारे २५००च्या आसपास रामसर स्थळे घोषित करण्यात आली आहेत. आपल्या देशात ७५हून अधिक जागांना रामसर स्थळाचा दर्जा मिळाला



आहे, तर महाराष्ट्रात तीन जागा आहेत. यामध्ये नांदूरमध्यमेश्वर, लोणार आणि अगदी अलीकडे २०२२मध्ये ठाणे खाडी अशा तीन जागा रामसर स्थळ म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्राचे भरतपूर अशी ओळख असलेल्या नांदूरमध्यमेश्वर अभयारण्याचा विस्तार सुमारे शंभर चौरस किमी इतका आहे. याठिकाणी कायम निवासी आणि स्थलांतरीत अशा जवळपास २५० विविध जातीच्या पक्षांची नोंद झाली आहे. केवळ पक्षीच नाही, तर इतरही सजीवसृष्टीची इथे विविधता आहे. ५५०हून अधिक विविध प्रकारच्या वनस्पती, ३०पेक्षा जास्त मासे प्रजाती, तर ४०पेक्षा जास्त फुलपाखरांच्या प्रजाती– इथे आढळतात. हजारो वर्षापूर्वी अशनीपात होऊन तयार झालेले लोणार सरोवर हे महाराष्ट्रातील बुलडाणा जिल्ह्यात आहे. तिथला पाणीसाठा क्षारयुक्त आहे. इथेसुध्दा पक्षांच्या सुमारे १६० प्रजाती, ४६ प्रकारचे सरीसृप आणि लांडग्यासहित १२पेक्षा अधिक सस्तन प्राण्यांची नोंद आहे. फ्लेमिंगोसाठी प्रसिद्ध असलेली ठाणे खाडी (उल्हास नदीची खाडी) याला अगदी अलिकडे रामसर स्थळाचा दर्जा मिळाला आहे. राज्य शासनाच्या विविध विभागांचा समन्वय यासाठी महत्त्वपूर्ण ठरला.

नैसर्गिक किंवा मानवनिर्मित असे एका प्रकारचे वर्गीकरण यात आहे. म्हणजे नैसर्गिकरित्या एखाद्या जागेत पाणी साचून किंवा काही कालावधीसाठी पाणी तसेच राहून पाणथळ जमिनी तयार होतात. निसर्गतः येणारे पूर, त्यातून पाण्याचा निचरा लवकर न होता पाणी साचून राहणे किंवा नद्यांच्या खाड्या हे याचे उत्तम उदाहरणे आहेत.

धरणाचे जलाशय, शेततळी, मिठागरे अशी मानवनिर्मित रामसर स्थळांची उहाहरणे देता येतील. जमा होणाऱ्या पाण्याच्या स्त्रोतावरूनसुद्धा पाणथळ जागांचे वर्गीकरण करतात. गोड्या/खाऱ्या पाण्यामुळे, लाटांमुळे तयार झालेले, लाटा आणि नदीचे गोडेपाणी यांच्या मिश्रणातून तयार झालेले, नद्यांना येणारे पूर, पावसाचे पाणी साचून तयार झालेले, मानवी हस्तक्षेपामुळे पाणी साचून तयार झालेले यांचा यामध्ये समावेश होतो.

अनेक पाणथळ जागांमध्ये पाण्याचे स्त्रोत हे एकापेक्षा अधिक असतात. त्यामुळे त्यांचे वर्गीकरण ठराविक अशा एका प्रकारात करता येत नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तीर्ण/प्रचंड आकाराच्या रामसर स्थळांची उदाहरणे म्हणजे अमेझॉन नदीचे खोरे. पश्चिम सैबेरिया, द. अमेरिकेतील पेंटावाल आणि आपल्या भारतातील सुंदरबन ही त्याची उदाहरणे होत.

पर्यावरणासाठी, त्याच्या संतुलनासाठी पाणथळ जागांचे महत्व मोठे आहे. वस्तूतः पाणथळ जागा या जमीन आणि पाणी यांचे समन्वय साधणाऱ्या असतात. केवळ पशुपक्षी नव्हे तर विविध लव्हाळी, हवा, ऑक्सिजन याच्या पोकळ्या असणाऱ्या वनस्पती, त्यांच्या आधाराने राहणारे सजीव आणि डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्मजीव, एकपेशीय जीवांनी पाणथळ जागा समृद्ध असतात. बहुतांश खाड्यांमध्ये विविध खारफुटी वनस्पती असतात.


मुख्यतः पूर नियंत्रणासाठी याचा फायदा होतो. नदीला आलेला पूर किंवा समुद्राच्या लाटा यांपासून जवळच्या जमिनीचे संरक्षण पाणथळ जागांमुळे होते. बहुतांश पाणथळ जागा या भूजलाशी जोडलेल्या असतात. त्यामुळे या पाण्याची गुणवत्ता आणि दर्जा राखण्यात या पाणथळ जागा महत्त्वाची भूमिका बजावतात. भूजल पातळी पुनर्भरणाचे करण्याचे काम या माध्यमातून होते. कांदळवन, प्रवाळ, आणि मीठ दलदलीचा प्रदेश हे किनारा संरक्षण आणि वादळापासून बचावाचे काम करतात. जैवविविधता जपण्याचे काम यातून होते.

अभ्यासक आणि पर्यटक या दोहोंसाठी पाणथळ जागा महत्त्वाच्या आहेत. इथल्या जैवविविधतेमुळे त्या ठराविक घटकांचा, सजीवांचा अभ्यास, तर होतोच, शिवाय त्यांच्या परस्परांमधल्या संबंधाचासुद्धा अभ्यास करता येतो. येथे येणाऱ्या पर्यटकांमुळे रोजगारी निर्मितीच्या संधी स्थानिकांना उपलब्ध होतात. एका अर्थाने पर्यावरणासोबतच आर्थिक अंगानेसुद्धा पाणथळ जागांचे महत्त्व मोठे आहे. सजीव आणि निर्जीव अशा अनेक घटकांची मिळून एक समृद्ध परिसंस्था पाणथळ जागांमध्ये नांदत असते.

गेल्या काही वर्षामध्ये वाढते औद्योगिकीकरण, भूजलाचा बेसुमार उपसा आणि त्याच्या पुनर्भरणासाठी होणाऱ्या प्रयत्नांची गती कमी असणे, आणि महत्वाचे म्हणजे घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी अशा पाणथळ जागांचा वापर यामुळे त्या आक्रसण्याची भीती आहे. याचा परिणाम त्यांची जैवउत्पादकता आणि जैवविविधता यावर होऊ शकतो. ते जपणे आपल्या सर्वांच्या हाती आहे.

आशिया खंडात रामसर स्थळांच्या बाबतीत भारताचा क्रमांक एक आहे. सर्वात जास्त क्षेत्र भारतात आहे. भारतीय उपखंडातील एकंदरीत पर्यावरणाच्या दृष्टीने पाणथळ जमिनी या जैवविविधता, हवामान, अनुकुलन, गोड्या पाण्याची उपलब्धता आणि एकूणच लोकसंख्येसाठी महत्वाच्या आहेत. भारतात सध्या ७५ रामसर स्थळे आहेत. शासकीय पातळीवर मोठ्या प्रमाणावर रामसर स्थळांच्या जतन आणि संवर्धनासाठी प्रयत्न सुरू झाले. सन २०१३ पर्यंत केवळ २६ जागा (पाणथळ जमिनी) रामसर जागा म्हणून घोषित करण्यात आल्या होत्या. त्यानंतर २०१४ ते २०२३ पर्यंत ४९ नवीन जागा समाविष्ट करण्यात आल्या.

**–दीपक चव्हाण,**
**विभागीय संपर्क अधिकारी**



## बदलते तंत्रज्ञान

# लॅपटॉपपासून स्मार्ट वॉचपर्यंत अनेक ऑफर्स

दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी हा व्हॅलेंटाईन वीक म्हणून साजरा केला जातो. यादरम्यान विविध कंपन्या ग्राहकांसाठी खास ऑफर्स घेऊन येत असतात. रिअल मी, अ‍ॅपलनंतर विजय सेल्स कंपनीसुद्धा व्हॅलेंटाईन डेनिमित्त टेक वस्तूंवर आकर्षक सूट देत आहे.



विजय सेल्समध्ये ६,६९९ रुपयांपासूनच्या मोबाईल फोन्सवर ऑफर, ४० टक्क्यांपर्यंत टॅबलेटवर सूट, १४९ रुपयांपासून सुरू असणारी ऑडिओ उपकरणे आणि ८९९ रुपयांपासून सुरू होणारे स्मार्ट वॉच, आकर्षक फिलिप्स उपकरणे, वेगा मल्टी ग्रुमिंग किट आणि आकर्षक फिलिप्स १००० वॉट हेअर ड्रायर ५,००० रुपयांपेक्षा कमी किमतीत तुम्ही अनेक वस्तू खरेदी करू शकणार आहात.

या सेलमध्ये रेडमी १३सी ५जी स्मार्ट फोनची किंमत १०,९९९ रुपये आहे तसेच अ‍ॅपल आयपॅड ९th जनरेशन एचडीएफसी बँकच्या इन्स्टंट डिस्काउंटसह २७,९०० रुपयांपर्यंत मिळणार आहे. या सेलमध्ये असूस रॉग६ ५जी हा गेमिंग फोन ४७,९९९ रुपयांना उपलब्ध असेल, ज्याची मूळ किंमत ७७,९९९ रुपये अशी आहे.

ऑडिओफाइल बोट रॉकेरझ ५५१ एएनसी हेडफोन्स फक्त २,७९९ रुपयांमध्ये या सेलमध्ये खरेदी करू शकणार आहात. रेडमी बड्स ४ ९९९ रुपये, सारेगामा कारवान हिंदी म्युझिक प्लेअर ६,२५० रुपयांत, जेबीएल सिनेमा एसबी१४० व त्याचे ११० डब्ल्यू आउटपुट ९,९९९ रुपयांना उपलब्ध असणार आहे. २९,९०० रुपयांना जेबीएल पार्टी बॉक्स ११० पोर्टेबल स्पीकर किंवा boat aavante Bar Quake २.१ ८,९९९ रुपयांना सेलमध्ये उपलब्ध असेल, तर पॉवर बँकसारख्या मोबाईल सेसरीजची किंमत फक्त ३४९ रुपयांपासून सुरू होईल.

सेलमध्ये फिलिप्सचे वनब्लेड ट्रीमर १,१९९ रुपयांना आणि फिलिप्स १००० बॉडी ट्रीमर १,१२९ रुपयांना उपलब्ध असणार आहे. महिलांना येथे ३,१९९ रुपयांना निग्मा आर३२ स्टायलिश स्मार्ट वॉच खरेदी करता येणार आहे. महिलांसाठी वेगा ३००० सीरिज ऑल इन वन हेअर स्टायलर या सेलमध्ये १,४५१ रुपयांना आणि ३००० सीरिज हेअर ड्रायर १,७८९ रुपयांना उपलब्ध असणार आहे.


लॅपटॉप डीलमध्ये अ‍ॅपल मॅकबुक एअर एम१ ८जीबी रॅम मॉडेल ८०,९९० रुपये, एचपी १५एस लॅपटॉप 12th जेन इंटेल आय३ प्रोसेसर ३९,९९० रुपयांना सेलमध्ये उपलब्ध असेल; तर प्ले स्टेशन ५ साठी सोनी ड्युअल सेन्स वायरलेस कंट्रोलर ५,७९० रुपयांमध्ये मिळेल.

# पेशवाईच्या काळातील नाना फडणवीस

कोकणातून साताऱ्यात आल्यावर १७१४ साली सातारच्या शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथांना पेशवेपदी नेमले. बाळाजी विश्वनाथांनी शाहू महाराजांकडे शब्द टाकून हरी भानू यांना फडणवीशी दिली, मात्र हरी भानू यांचे चार–पाच महिन्यात निधन झाले. त्यांच्यानंतर बाळाजी (बळवंत) यांच्याकडे फडणवीशी आली. ते दिल्लीच्या स्वारी असताना त्यांना दिल्लीत मारण्यात आले. त्यांच्यानंतर रामचंद्र फडणवीस झाले. त्यांचे १७२४ साली निधन झाले. त्यानंतर बाळाजी यांचे पुत्र जनार्दन यांच्याकडे फडणवीशी आली.

नाना फडणवीसाचे भानू घराणे आणि पेशव्यांचे भट घराणे यांचा संबंध अनेक वर्षांपासूनचा आणि पिढ्यांचा होता. बाणकोटच्या खाडी या दोन्ही घराण्यांशी संबंधित आहे. खाडीच्या उत्तरेस भट घराण्याचे श्रीवर्धन आणि दक्षिणेस भानू घराण्याचे वेळास.

जनार्दन फडणवीस आणि रखमाबाई यांच्यापोटी जन्मास आलेले बाळाजी जनार्दन म्हणजेच नाना फडणवीस होय. नाना फडणवीस यांचा जन्म १२ फेब्रुवारी १७४२ रोजी सातारा येथे झाला. राघोबा दादांबरोबर उत्तर हिंदुस्थानाच्या मोहिमेत जनार्दन फडणवीस यांचे निधन झाले. अत्यंत हुशार तल्लखबुद्धीच्या नाना फडणवीसांना त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर १७५६ साली फडणवीशी मिळाली. ते नानासाहेब पेशव्यांबरोबर स्वारीवरही जाऊ लागले.



## निमित्त

१७५७ साली त्यांनी श्रीरंगपट्टणमच्या मोहिमेत भाग घेतला त्यानंतर पानिपतच्या मोहिमेत ते सदाशिवरावभाऊ आणि विश्वासरावांसह सहभागी झाले.

पानिपतच्या युद्धानंतर नानासाहेब पेशवे फार काळ जगले नाहीत. सहा महिन्यांतच त्यांचा २३ जून १७६१ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यानंतर थोरले माधवराव पेशव्यांनी वस्त्रे स्वीकारली. नाना फडणवीस आता माधवरावांबरोबर काम करू लागले.

पेशवे मोहिमेवर जाताना कारभाराची जबाबदारी, किल्लेकोट नानांच्या भरवशावर टाकून जात. पराक्रमापोटी ते मोहिमांमध्ये विजयी होत असले तरी त्याचे थोडे श्रेय नाना फडणवीसांनाही दिले पाहिजे, असे मत वासुदेवशास्त्री खरे नोंदवतात. मोहिमांना लागणारा पैसा, दारूगोळा वेळेच्या वेळेस नाना पाठवत आणि राज्याची काळजी घेत म्हणूनच या मोहिमा पेशव्यांना निर्धोकपणे पार पाडता येत असे ते खऱ्यांनी लिहून ठेवले आहे.

माधवरावांच्या कार्यकाळामध्ये नाना फडणवीसांकडे फडणीशीबरोबर अनेक जबाबदाऱ्या आल्या असे ’नाना फडणवीस अँड द एक्स्टर्नल अफेअर्स ऑफ द मराठा एंपायर’ या पुस्तकाचे लेखक वाय. एन. देवधर यांनी लिहून ठेवले आहे.

फडणीशी म्हणजे बजेटची आखणी, हिशेब ठेवणे, ऑडिट आणि पेशव्यांच्या राजधानी जबाबदारी पाहणे हे काम नानांकडे आले तसेच मोहिमांच्या वेळेचीही व्यवस्था त्यांच्याकडे आली. देवधरांच्या या शब्दांमधून नानांच्या वाढत्या दबदब्याचा अंदाज येतो.

राघोबादादा आणि माधवराव यांच्यात बेदिली होतीच. माधवरावांनी राघोबादादांना शनिवारवाड्यात कैद करून ठेवले होते. त्यांच्यावर देखरेखीसाठी नाना फडणवीसांना नेमण्यात आले. २ एप्रिल १७६९ रोजी राघोबादादांनी शनिवारवाड्यातून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता, मात्र नानांनी त्यांना पुन्हा पकडून बंदोबस्तात ठेवले.

माधवरावांचा १७७२ साली क्षयामुळे मृत्यू झाला. मृत्यूपर्यंत नाना फडणवीस आणि हरिपंत फडके त्यांच्याबरोबर होते. अनेक चढ–उतारांनी भरलेल्या त्यांच्या आयुष्याची कहाणी एखाद्या सिनेमासारखी नाट्यमय वाटते. त्यांच्या कारकिर्दीकडे पाहिल्यानंतर मराठा साम्राज्यातील त्यांचे महत्त्वाचे स्थान उमगते. (साभार : इंटरनेट)

## क्लिक...क्लिक...!





**सांगली (विटा) : सध्या दाक्षाचा हंगाम सुरू असून, माहुली (ता.खानापूर) येथील प्रगतशील शेतकरी दशरथ धोडिंराम माने यांनी त्यांच्या शेतात तास–ए–गणेश या वाणाच्या दाक्षाची बाग फुलवली आहे. दशरथ माने हे आपल्या शेतात योग्य नियोजन व नवनवीन प्रयोग नेहतीच करीत असतात. या द्राक्षाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे.** (छाया : महेंद्र बारसिंग)

## आरोग्य प्रहर

# चमकदार त्वचा अन् घनदाट केसांसाठी...

थंडीच्या दिवसांमध्ये बहुतेकांना कोरड्या त्वचेचा त्रास होतो. कोरडेपणामुळे त्वचेवर काळसरपणा येण्यासह पांढरे पॅच दिसू लागतात. अशा वेळी दिवसभर मॉइश्चरायझर लावूनही काही परिणाम दिसत नाही. यात केसांसंबंधित समस्यादेखील वाढताना दिसतात. विशेषत: रात्रीच्या वेळी तुम्ही त्वचा आणि केसांची काळजी घेण्यासाठी काही गोष्टी फॉलो केल्यास काही दिवसांतच त्वचा मुलायम, चमकदार होण्यास व केस घनदाट होण्यास मदत होऊ शकते. याविषयी drmanasiskin.comच्या संस्थापक आणि त्वचारोगतज्ज्ञ डॉ. मानसी शिरोलीकर यांनी माहिती दिली आहे.



बेडरुममधील हवेत आवश्यक आर्द्रता टिकवण्यासाठी ह्युमिडिफायरचा वापर करा. याच्या वापराने तुमची त्वचा व केस कोरडे होण्यापासून प्रतिबंधित करता येते.

रात्रीच्या स्कीनकेअर रूटीनचा भाग म्हणून सॉफ्ट, हायड्रेटिंग क्लीन्सर किंवा क्लीनिंग लोशनचा वापर करा. यामुळे त्वचेतील नैसर्गिक तेलाचे प्रमाण कमी न करता चेहऱ्यावरील मेकअप आणि अशुद्ध घटक प्रभावीपणे काढू शकता.

त्वचा हायड्रेटिंग ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी हायलूरोनिक अ‍ॅसिड आणि सिरॅमाइड्स घटक असणाऱ्या स्कीन केअर प्रोडक्टचा वापर करा. यामुळे त्वचा निरोगी ठेवण्यासह मदत होते तसेच जास्त काळ त्वचेतील हायड्रेशन टिकून राहते. कोरड्या त्वचेसाठी तुम्ही शिया बटर आणि ओटमील असलेले स्कीन केअर प्रोडक्ट वापरू शकता.

अंघोळीनंतर आणि झोपण्यापूर्वी ओलसर त्वचेवर बॉडीलोशन लावायला विसरू नका. फक्त चेहराच नाही तर कोपर आणि गुडघे यांसारख्या जास्त कोरडेपणा जाणवणाऱ्या भागात लोशनचा वापर करा तसेच रात्रभर कॉटनचे हातमोजे आणि पायमोजे वापरा.

रात्री झोपण्यापूर्वी लिव्ह–इन कंडिशनरच्या मदतीने केसांचे कंडिशनिंग करा. असे केल्यास केसांना योग्य पोषण मिळते. शिवाय ते तुटण्यापासून रोखता येतात तसेच केस मुलायम आणि घनदाट होतात.

हिवाळ्यात गरम पाण्याने अंघोळ करताना बरे वाटते, परंतु यामुळे तुमच्या त्वचा आणि केसांमधील नैसर्गिक तेलाचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे कोरडेपणा वाढतो. ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आणि होणारी जळजळ रोखण्यासाठी कोमट पाण्याने अंघोळ करा. यातून त्वचा हायड्रेटेड राहील.

झोपण्याआधी ओठांना हायड्रेटिंग लिप बाम लावा. स्कीनकेअर रुटीनदरम्यान ओठांकडे अनेकदा दुर्लक्ष होते. यामुळे ओठ कोरडे होण्यासह भेगा पडल्याने त्यातून रक्त येऊ लागते. लिप बामचा वापर करून ओठ मऊ आणि गुळगुळीत ठेवू शकता.

## निवडक

### चोळई येथे तरूणाची आत्महत्या

**पोलादपूर :** शहरानजिक चोळई गांवाच्या हद्दीतील नवीन वसाहत येथे १९ वर्षीय तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना निदर्शनास आली. रविवारी सकाळी ११ वाजण्याच्या पूर्वी या तरुणाने दारूच्या नशेत कपडयांच्या साह्याने झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. पोलादपूर तालुक्यातील सडवली ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील चोळई गावातील नवीन वसाहत येथील एका आंब्याच्या झाडाला वरूण शांताराम गायकवाड वय १९ वर्षे या तरूणाने कपडयांच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची माहिती पोलादपूर पोलीस ठाण्याला मिळताच पोलीस निरिक्षक अनिल जाधव आणि सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या वेळी मयताने आत्महत्येपूर्वी दारू पिल्याचा प्राथमिक अंदाज पोलीसांनी व्यक्त केला आहे.

### महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**कर्जत :** कोकण ज्ञानपीठ कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि समर्पण रक्त केंद्र घाटकोपर यांच्या संयुक्त विद्यमाने केलेले रक्तदान शिबिर झाले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे ४८८ वे शिबिर ठरले. प्राचार्य डॉ. चंद्रकांत गोंधळी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी राजाभाऊ कोठारी, डॉ.सुजाता कुलकर्णी, डॉ. गंगाधर शिंदे, आमिर मणियार, आदित्य भोईर, अनन्या थोरवे, साक्षी देशमुख, सलोनी दरेकर, प्राजक्ता देशमुख, साहिल गंगावणे, मीनल लोभी, सिद्धांत मोरे, ओम रुठे आदी उपस्थित होते. रक्तसंकलानाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्त केंद्राचे डॉ. रमेश सिंग, लता देशक, लक्ष्मण नाईककाका, अनिता कोटनकर, राजेश सोळंकी, सुनील नीले आदींनी केले.



# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यदायी उपक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पोलादपूर शहर शिवसेनेतर्फे रक्तदान शिबिर, हिमोग्लोबिन तपासणी शिबिर, आरोग्य तपासणी, आभा व आयुष्यमान कार्ड देण्याचे उपक्रम आयोजित करण्यात आले. या वेळी स्वयंसिध्दा संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी नंदकुमार गोंधळी व पथनाटयातील कलाकारांनी एडस जनजागृतीपर पथनाटयाचे सादरीकरण करून उपक्रमामध्ये जिवंतपणा आणला.



पोलादपूर शहरातील स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृहामध्ये पोलादपूर शहर शिवसेनेतर्फे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असता तहसीलदार कपिल घोरपडे, नगराध्यक्षा सोनाली गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, सुनीता पार्टे, प्रसाद इंगवले, अंकिता जांभळेकर निकम, अस्मिता पवार, सिध्देश शेठ, मनोज प्रजापती, विनायक दिक्षित, शिल्पा दरेकर यांच्यासह माजी उपसरपंच तुर्डेबुवा, सचिन मेहता, सुजय जाधव तसेच शिवसेनेचे असंख्य पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी 'आपला दवाखाना'चे वैद्यकीय पथक आणि ग्रामीण रूग्णालयाचे समुपदेशक आयटीसीचे अमोल नारखेडेदेखील या उपक्रमामध्ये सहभागी झाले होते.

या वेळी सामाजिक विकास ट्रस्ट पेण येथील सुपरवायझर समीर सुतार आणि लिंक वर्कर सायरा धामणकर यांनी सहभाग घेतला.

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका शिवसेना शिंदे गटाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त मुरुड ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळ व पोषक आहार वाटप करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा केला.

कार्यक्षम मुख्यमंत्री म्हणून त्यांचा नावलौकिक आहे व गरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी ते मंत्रालयात तासन्तास काम करीत असतात. त्यांना दीर्घ आयुष्य मिळावे यासाठी मुरुड शिवसेनकडून लोकाभिमुख उपक्रम राबवण्यात आला आहे.

या वेळी शिवसेना रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, शिवसेना तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते भाई सुर्वे, सी.एम. ठाकूर, माजी सरपंच हरि भेकरे, वावडुंगी सरपंच ऋतुजा वरणकर, सुनील शहा, मंदा ठाकुर, सागर चौलकर, युवा शहर प्रमुख ओम पाटील, मनोज कमाने, सुरेश भुवड, विशाल पाटील, अमोल लाड, जाय पाटील मॅडम, सुनील दिवेकर, भारत मोती, संतोष पाटील, सुरेश ठाकूर, अशोक पाटील, ओमकार साखरकर, महेश पाटील आदी उपस्थित होते.



# रायगड महासंस्कृती महोत्सवाचे आज उद्घाटन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय व रायगड जिल्हा प्रशासन आयोजित रायगड महासंस्कृती महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री उदय सामंत आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सोमवारी (दि.१२) सायंकाळी ६ वाजता पोलीस परेड मैदान, अलिबाग येथे होणार आहे.१२ ते १६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवाचा लाभ जिल्हावासियांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ योगेश म्हसे यांनी केले आहे.

या महोत्सवात आगरी, कोळी संस्कृतीसह विविध लोककला याबरोबरच विशेष निमंत्रितांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६ यावेळेत अलिबाग येथील स्थानिक कलाकारांचा शिवकालीन संस्कृती दर्शविणारा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये मर्दानी खेळ, पोवाडे यांचा समावेश आहे. तर सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत अवधूत गुप्ते यांचा संगीत रजनी कार्यक्रम होणार आहे. १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६ यावेळेत अलिबाग येथील स्थानिक कलाकारांचा कोळी संस्कृती दर्शविणारा कार्यक्रम होणार आहे. तर सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत अशोक हांडे यांचा मराठी बाणा कार्यक्रम होणार आहे. १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६ यावेळेत पारंपारिक लोकनृत्य कार्यक्रम होणार आहे. तर सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत नंदेश उमप यांचा महाराष्ट्राची संस्कृती कार्यक्रम होणार आहे. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६ यावेळेत स्थानिक कलावंताचा दशावतार कार्यक्रम होणार आहे. तर सायंकाळी ७ ते रात्रौ १० या वेळेत रत्नकांत जगताप यांचा महाराष्ट्राची लोकधार संगीत रजनी कार्यक्रम होणार आहे.

१६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६ यावेळेत स्थानिक कलावंताचा आगरी संस्कृतीचे दर्शन घडविणारा कार्यक्रम होणार आहे. तर सायंकाळी ७ ते रात्रौ १० या वेळेत महानाट्य शिवबा होणार आहे.

या महोत्सवात विविध प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १) पेण येथील श्री गणेश मूर्तीकार यांनी घडविलेल्या गणेशमूर्तीचे प्रदर्शन. २) शिवकालीन शस्त्र प्रदर्शन, ३) शिवदुर्ग प्रदर्शन, ४) स्थानिक बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादन दालन तसेच खाद्यपदार्थ दालन यामध्ये वारली कला, कोकण मेवा, दगडी वस्तू, मातीची भांडी, नारळापासून बनविलेले विविध कलाकुसर वस्तू, स्थानिक मसाले, बांबूपासून तयार केलेल्या वस्तू तसेच कृषी प्रक्रिया आधारित विविध दालन. या महोत्सवात ५० बचतगट सहभागी होणार आहेत.

सर्वांना मोफत प्रवेश असून जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे व या सांस्कृतिक मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# 'अवांतर चर्चा करण्यापेक्षा अवांतर वाचनावर भर द्या'

**महाड : प्रतिनिधी**

आपल्याला भावी आयुष्य उज्वल करायचे असेल आणि स्पर्धात्मक परीक्षांना तोंड द्यायचे असेल तर विद्यार्थ्यांनी अवांतर चर्चा करत बसण्यापेक्षा अवांतर वाचनावर भर दिला पाहिजे, असे मत महाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. ज्ञानोबा बानापुरे यांनी व्यक्त केले. महाड पत्रकार संघाच्या वाचन चळवळ अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात रायगड कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयात ते बोलत होते.




समाजामध्ये वाढता मोबाईल आणि टेलिव्हिजन सारख्या आधुनिक यंत्रांच्या वापरामुळे घटत चाललेली वाचन संस्कृती जोपासण्यासाठी महाड पत्रकार संघाच्या वतीने वाचन जनजागृती अभियान सुरू करण्यात आले आहे. या वाचन जनजागृती अभियानाचा दुसरा टप्पा मोहोप्रे गावातील रायगड कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये आयोजित करण्यात आला होता.

या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. ज्ञानोबा बानापुरे, महाड तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मायने, कॉलेजचे व्यवस्थापक विजयराव चिमणकर, महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, उपाध्यक्ष महेश शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे यांनी स्पर्धा परीक्षा ला सामोरे जात असताना वाचन किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले आपल्या दैनंदिन जीवनामधील वाचनाव्यतिरिक्त अवांतर वाचन करणे ही काळाची गरज आहे असे सांगून विद्यार्थ्यांनी अवांतर विषयांवर चर्चा करत बसण्यापेक्षा अवांतर वाचनाला भर दिला पाहिजे, असा मोलाचा सल्ला दिला.

या वेळी प्राचार्य माया देसाई, विजयराज चिमणकर, महेश शिंदे, यांनीदेखील आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाड पत्रकार संघाचे सचिव रोहित पाटील, उदय सावंत, मिलिंद माने, गोपाळ कांबळे, राजेंद्र जैतपाल, प्रोफेसर मानकर सर, प्राचार्य मुंडे सर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र जैतपाल यांनी केले.

# मुरूड शहर राष्ट्रवादीतर्फे हळदीकुंकू समारंभ

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगडचे खासदार व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सुनील तटकरे, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून मुरूड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे हळदीकुंकू समारंभ उत्सहात झाला. मुरूड शहतातील बाजरपेठ जैन वाडीमध्ये हा हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास महिलांनी शेकडोच्या संख्येने उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमासाठी मुरूड शहरास ग्रामीण भागातील २५०० महिलांनी हळदीकुंकू समारंभास उपस्थिती लावली. त्याच प्रमाणे खेळ पैठणीचा हा विशेष कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आला होता. पैठणी खेळात २५० महिलांनी सहभाग घेऊन या मध्ये पैठणी जिंकण्याचा मान अपर्णा विनय सुभेदार, राजश्री सुरेश सदरे, टीना महावीर जैन यांनी पटकावला आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रसिद्ध अँकर डी. महेश यांनी केले.

विजेत्या महिलांना पैठणी व सन्मान चिन्ह मुरूड तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष फैरोज घलटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला तालुका अध्यक्ष ॲड. मृणाल खोत, माजी सभापती अशीका ठाकूर,अलिबाग मुरुड मतदार संघाच्या उपाध्यक्षा स्मिता खेडेकर, सोशल मीडिया रायगड जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, सचिव विजय पैर, मुरूड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर आदी मान्यवर यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

हळदीकुंकू समारंभासाठी मुरुड शहर व तालुक्यातील शेकडो महिलांनी या हळदीकुंकू समारंभाचा लाभ घेतला.





# अष्टविनायक क्षेत्र महड येथे गणेशजन्म माघी महोत्सव

**खोपोली :** वरदविनायक अष्टविनायक क्षेत्र महड (खालापूर) येथे गणेश जन्म माघी महोत्सवा निमित्ताने या वर्षी भरगच्च धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



गणेश जन्मोत्सव महोत्सवाची सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली असून मंगळवार (दि. १३) पासून शुक्रवार (दि. १६)पर्यंत सहा दिवस या निमित्ताने धार्मिक, सामाजिक व आध्यात्मिक स्वरूपाचे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. सर्व कार्यक्रम सुनियोजित वेळेत पार होण्यासाठी गणपती संस्थान महडच्या कार्याध्यक्ष मोहिनी वैद्य यांच्या नेतृत्वाखाली विश्वस्त मंडळ सर्व पदाधिकारी व मंदिर व्यवस्थापन समिती कडून जोरदार तयारी करण्यात आली आहे.

मुख्य कार्यक्रम मंगळवारी कोकण विभागाचे आयुक्त महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते श्रीगणेशाची महापूजा होऊन गणेश जन्मोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. दुपारी गणेश जन्मोत्सव निमित्त प्रख्यात कीर्तनकार चारुदत्त आफळे महाराज यांचे क्रीर्तन होणार आहे. संध्याकाळी चार वाजता प्रख्यात हास्य कलाकार कुशल बद्रिके याचा उपस्थितीत खेळ पैठणीचा हा महिलांसाठी भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दहीहंडी सोहळा, भजन, कीर्तनासह सहा दिवस अध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल अष्टविनायक क्षेत्र महड येथे होणार आहे.



**महड : वरदविनायक मंदिरातील गणेश जन्म माघी महोत्सव सोहळ्यात राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांनी पहिल्या दिवशी कीर्तन सेवा सादर केली.**

# अंतुले हायस्कूलमध्ये करिअर समुपदेशन व मार्गदर्शनपर कार्यक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

अदानी फाउंडेशन च्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच भविष्यात दहावी आणि बारावी नंतर कुठल्या क्षेत्रात विविध संधी उपलब्ध आहेत. याबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले हायस्कूल दिघी तसेच डॉक्टर ए आर उंद्रे इंग्लिश मिडीयम हाय स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय राजपूरी येथे दोन दिवसीय करिअर समुपदेशन व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक मधुकर चव्हाण, ग्लोबल लर्निंग कन्सल्टंट आणि तज्ञ करिअर समुपदेशक, पुणे यांनी विद्यार्थ्यांना, शिक्षकांना तसेच पालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले हायस्कूल दिघी येथील मुख्याध्यापक उत्तम वाणी, पर्यवेक्षिका पडवळ मॅडम, शाळा व्यवस्थापन समितीचे सलीम भाई अंतुले, जयदास अंबाजी, त्याचप्रमाणे डॉक्टर ए आर उंड्रे हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय येथील प्राचार्य रिझवान हूर्झुक, शिक्षक दिनेश डोंगरीकर, अदानी फाउंडेशन वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे, दिघी पोर्ट लिमिटेड सुरक्षा विभाग प्रमुख चंदर देव संब्याळ, त्याचप्रमाणे सर्व शिक्षकवृंद, पालकवर्ग उपस्थित होते.

प्रास्ताविक जयश्री काळे, आभार प्रदर्शन अदानी फाउंडेशन चे अवधूत पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी ग्राम सखी प्राजक्ता आदुळकर, नम्रता दिघीकर, प्रज्ञा कासारे व सुप्रिया चव्हाण यांनी केले.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 5. | e-Tender-02/24-2 / Rfx No. 7000029905 | Work of cleaning & sweeping of office premises at 400kV Nagothane, 220kV IPCL and MSETCL colony along with operating water supply system to all buildings Every day under 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane | Rs 2,88,045/- | 16.02.24 up to 16:00 hrs |

EMD fee Rs. 5000/- & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID : ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs. 500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo: -7000029761** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-65/ 2023-2024.** Extension to RFx e-tender for work of rewiring of 3 nos of 22kV C & R double feeder panel in new control room at 220 kV ONGC SS Panvel under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 4,28,061/-, EMD amount Rs. 5,000/-.** |
| 2 | Online Downloading theRFx | **10.02.2024, 18:00 Hrs. to 19.02.2024, 23:59Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 19.02.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **20.02.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

# महामार्ग पोलिसांतर्फे रस्ते सुरक्षा अभियान



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे चौकी या ठिकाणी सुखविंदर सिंग, अपर पोलीस महासंचालक (वा) महाराष्ट्र राज्य, मुंबई, तानाजी चिखले, पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस रायगड परिक्षेत्र, घनश्याम पालंगे, पोलीस उप अधीक्षक महामार्ग पोलीस रायगड विभाग तसेच गौरी मोरे, महामार्ग पोलीस पनवेल विभाग यांचे मागदर्शनाखाली रस्ते सुरक्षा अभियान २०२४च्या अनुषंगाने मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाकरिता प्रमुख पाहुणे महामार्ग पोलीस केंद्र रायगड परिक्षेत्र पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, शिवसेना जिल्हाध्यक्ष व जिल्हा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे, महामार्ग पोलीस पोलीस उपअधीक्षक घनश्याम पलंगे, पोलीस निरीक्षक गौरी मोरे, मोटार वाहन निरीक्षक अजय कराळे, अपघातग्रस्तांना मदत सामाजिक संस्था अध्यक्ष गुरुनाथ साठेलकर, कॅरी इनदेव लॉजिस्टिकचे संचालक ज्युड फर्नांडिस, भाजप उत्तर रायगड जिल्हाप्रमुख सुधीर ठोंबरे, जनता विद्यालय आजीवलीचे प्राचार्य दिलीप चवरे, सेवा सहयोग फाउंडेशनचे प्रोजेक्ट मॅनेजर संदेश घरत असे प्रमुख अतिथी मान्यवर उपस्थित होते.

सुधागड हायस्कूल कळंबोली, जनता विद्यालय आजिवली व रायगड जिल्हा परिषद शाळा भिंगार कडील एकूण ३५० शाळेचे विद्यार्थी तसेच मृत्युंजयदुत, देवदूत टीम, डेल्टा फोर्स टीम, महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार व पंचक्रोशीतील सुजाण नागरिक असे एकूण ४०० ते ५०० जनसमुदाय उपस्थित होते. रस्ता सुरक्षा अभियान २०२४ कार्यक्रमात माननीय प्रमुख अतिथी यांनी महामार्गावर होणारे अपघात व त्याची कारणे, परिणाम व त्यावर करण्यात येणाऱ्या उपायोजनाबाबत व वाहतूक नियमाचे पालन करणेबाबत तसेच अपघात समयी जखमींना तत्काळ मदत करणेबाबत उपस्थितांना मार्गदर्शक करून आपले मनोगत व्यक्त केले.

महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे हद्दीतील महामार्गावरील सन २०२२ मध्ये एकूण १२४ अपघात झालेले असून त्यात ४३ लोक मयत झाले आहेत, परंतु सन २०२३ मध्ये महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेकडून वाहन चालक मालक व नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमाबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आलेले असल्याने महामार्गावरील अपघातामध्ये लाक्षणिक घट झालेले असून त्याचे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी झालेले आहे. सन २०२३मध्ये एकूण ८६ अपघात ३६ लोक मयत झाल्याबाबतची माहिती प्रभारी अधिकारी गणेश बुरकुल यांनी आपल्या भाषणात दिली.

रस्ता सुरक्षा अभियान २०२४ कार्यक्रमादरम्यान माननीय पाहुण्यांनी महामार्गावरील होणाऱ्या अपघातामध्ये अपघातग्रस्तांना तत्काळ मदत करणारे मृत्युंजय दूत, देवदूत व विशेष कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आलेले आहे.

हा कार्यक्रम अत्यंत दिमाखात झालेला असून कार्यक्रमात महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेकडील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्यांना दिलेली जबाबदारी अतिशय उत्कृष्टपणे पार पाडून कार्यक्रम अतिशय उत्तम प्रकारे साजरा होणेस सहयोग केलेले आहे. याबद्दल सर्वांचे प्रमुख पाहुण्यांनी व तानाजी चिखले, पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस रायगड परिक्षेत्र, घनश्याम पालंगे, पोलीस उपअधीक्षक महामार्ग पोलीस रायगड विभाग तसेच गौरी मोरे, महामार्ग पोलीस पनवेल विभाग यांनी अभिनंदन केले आहे.

# ग्रंथालयालयाच्या इमारतीला अत्याधुनिक बनविले जाईल -आमदार महेश बालदी

**उरण : वार्ताहर**

ग्रंथालयालयाच्या इमारतीला अत्याधुनिक पद्धतीने उभी करण्यात येईल तसेच जी काही मदत लागेल ती दिली जाईल. ग्रंथालयकडून होत असलेली सेवा चांगल्या प्रकारे होत आहे, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे ५८ व्या वार्षिक अधिवेशन उद्घाटनावेळी केले.

उरण देऊळवाडी येथील असलेल्या श्री गोपाळ कृष्ण वाचनालय यांच्या सहकार्याने रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे ५८व्या वार्षिक अधिवेशन रविवारी (दि. ११) रामकृष्ण आत्माराम पाटील सभागृह, सोमवंशी क्षत्रिय पाठारे ज्ञाती समाज, चिंबळथळी, म्हातवली-उरण येथे झाले. उद्घाटक आमदार महेश बालदी होते. कार्यक्रमाचे आयोजक श्री गोपाळ कृष्ण वाचनालय अध्यक्ष ॲड. पराग दत्तात्रेय म्हात्रे व सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी होते.

आज वाचक कमी होत चालले आहेत. वाचनालयाने वाचकापर्यंत जाण्याची गरज आहे. शासन ग्रंथालयाला अल्पप्रमाणात मदत करीत आहे. सरकारने मदत भरपूर प्रमाणात करावी, अशी मी विनंती करतो, असे प्रतिपादन रायगड भूषण एल.बी. पाटील यांनी या वेळी केले.

या वेळी व्यासपिठावर आमदार महेश बालदी, प्रमुख अतिथी रायगड भूषण एल.बी. पाटील, श्री गोपाळ कृष्ण वाचनालय अध्यक्ष ॲड. पराग म्हात्रे, संजीवन म्हात्रे, जिल्हा ग्रंथालय अध्यक्ष अजित पवार, जिल्हा ग्रंथालय युनियनचे अध्यक्ष संजय बोरदाडे, ग्रंथालय पत्रकार कृष्ण बाळ, कार्यकर्ता शैलजा पाटील आदी उपस्थित होते.

उपाध्यक्ष अरुण पाठारे, सचिव श्रीकांत वैश्पपायन, माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, हितेश शाह, ॲड. वर्षा पठारे, परेश मेस्त्री, अजित भिंडे, कुणाल शिसोदिया, नागेश कुलकर्णी सिद्येश लखमदे, प्रकाश पाटील, अभय घरत व श्री गोपाळ कृष्ण वाचनालय सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी आदी उपस्थित होते.




# डॉक्टरांसाठी कॅन्सर जागृती शैक्षणिक सत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक कर्करोग दिनानिमित्त एसीआय आचार्य नानेश हॉस्पिटल, सीबीडी बेलापूर यांनी नवी मुंबईतील डॉक्टरांसाठी कॅन्सर जागृती शैक्षणिक सत्राचे आयोजन केले होते.

रुग्णांमध्ये कॅन्सरचे लवकर निदान आणि निदान याविषयी त्यांना शिक्षित करण्याच्या उद्देशाने हे सत्र खास नवी मुंबईतील फॅमिली फिजिशियन्ससाठी आयोजित करण्यात आले होते. एसीआय आचार्य नानेश हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालकडॉ. निखिल वर्गे यांनी उद्घाटनपर भाषण केले.

आमचे संस्थापक विश्वस्त स्व. एच.एस. रंकाजी आणि एचएसआरएफ ट्रस्ट यांच्या पाठिंब्याने आचार्य नानेश हॉस्पिटलचा दशकभराचा प्रवास त्यांनी सादर केला. हॉस्पिटलच्या कॅन्सर इनिशिएटिव्हबद्दलही त्यांनी सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमात सामान्य चिकित्सकांचा चांगला सहभाग दिसला. ज्यांनी कर्करोगाशी संबंधित विविध विषयांवरील जागरूकता चर्चांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. डॉ. प्रिया एशपुनियानी यांनी जीवनशैली आणि कर्करोग या विषयावर तर डॉ. सागर वैश्यमपायन यांनी तोंडाच्या कर्करोगाचे निदान आणि त्यापासून बचाव या विषयावर सविस्तर माहिती दिली.

प्रख्यात कॅन्सर सर्जन डॉ. संजय शर्मा यांनी फूड पाईप उपचारांबद्दल सविस्तर माहिती दिली आणि डॉ. दीपक पारीख यांनी देखील श्रोत्यांना डोके आणि मानेच्या कर्करोगाच्या व्यवस्थापनात नवीनतम शस्त्रक्रिया आणि लेझर प्रगतीबद्दल माहिती दिली. सत्राचा समारोप होताच डॉ. राहुल बाजपेई ग्र यांनीही सहयोग आणि कॅन्सर केअरची अधिक प्रभावी निर्मिती करण्याच्या हेतूबद्दल सांगितले.

# शिरवणे विद्यालयामध्ये एसएससी सराव परीक्षा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे विद्यालय व जुनियर कॉलेज, नेरूळ या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले होते. या सराव परीक्षेला शिरवणे विद्यालय केंद्रावरती साधारणपणे तीनशे विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी आपला सहभाग नोंदवला.

विद्यार्थी वर्गातील बोर्ड परीक्षेची भीती जावी, पेपर कसा सोडवावा हा त्यामागील मुख्य हेतू होता. कार्यक्रमावेळी




विद्यालयाचे अध्यक्ष भाजप नेते डॉ. राजेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व येणाऱ्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर प्रथम क्रमांक दहा हजार रुपये पारितोषिक व द्वितीय क्रमांक पाच हजार रुपये पारितोषिक व तृतीय क्रमांक अडीच हजार रुपये पारितोषिक व उर्वरित दहा विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ दिड हजार रुपये पारितोषिक व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन या वेळी सन्मानित करण्यात आले.

या वेळी अध्यक्ष डॉ. राजेश पाटील, विद्यालयाच्या प्राचार्य भाग्यश्री चौधरी पालक वर्ग शिक्षक वर्ग तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.

# गरजू विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना प्रक्रियेस सुरुवात

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका कार्यक्षेत्रातील इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या गरीब व गरजू घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती वितरण करणे ही योजना महापालिका आयुक्त राजेश नार्वे कर यांच्या मार्गदर्शनानुसार महापालिकेच्या समाजविकास विभागामार्फत ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. या योजनांची माहिती www.schemenmmc.com या वेब साईटवर उपलब्ध असून नागरिकांनी त्यांचा मोठया प्रमाणावर लाभ घ्यावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

या योजनांमध्ये विधवा अथवा घटस्फोटित महिलांच्या मुलांना शिष्यवृत्तीचे वितरण करणे. आर्थिक व दुर्बल घटकातील शाळेत जाणाऱ्या इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन विद्यार्थांना शिष्यवृत्तीचे वितरण करणे. आदींचा समावेश आहे. विविध घटकांतर्गत राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनेकरिता दि.०८ ते दि. २८ फेब्रुवारी २०२४ पर्यंत विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने अर्ज www.schemenmmc.com या संकेतस्थळावर स्विकारण्यात येणार आहेत. अंतिम दिनांकानंतर म्हणजेच २८ फेब्रुवारी २०२४ रोजी नंतर प्राप्त अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

या शैक्षणिक शिष्यवृत्तीकरीता अटी व शर्ती संकेतस्थळावर उपलब्ध असून महापालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचा महापालिका क्षेत्रातील गरजू विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केले आहे.

# सानपाडा येथील दत्त मंदिर परिसर सुधारणार

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सानपाडा येथील श्रीदत्त मंदिराच्या दिशेन जाणाऱ्या सर्विस रोडचे काम गेली अनेक वर्ष रखडे होते. आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडे नागरिकांनी सुविधा पुरवण्याची मागणी केली होती. अखेर आमदार मंदा म्हात्रे यांनी नागरिकांची होणारी गैरसोय पाहता तब्बल चार कोटींचा आमदार निधी दिला आहे. सर्विस रोड व संरक्षण भिंतीसाठी चार कोटी रुपये दिला आहे. यातील तीन कोटी १५ लाख सर्विस रोडसाठी व संरक्षण भिंतीसाठी ८३ लाख रुपये वापरण्यात येणार आहेत. आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते या कामांचे भूमिपूजन केले.

सानपाडा येथील दत्त मंदिर हे जागृत देवस्थान आहे. तिथे दरवर्षी यात्रा जत्रा भरते. मुंबई, पनवेल, उरणमधून भाविक दर्शनाला येतात, परंतु काही काळापासून श्री दत्त मंदिरामध्ये जत्रेसाठी येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांची संख्या वाहडक्याने हा रस्ता हा अरुंद पडत आहे. त्यामुळे



भाविकांना गाड्या ये-जा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता.ही बाब लक्षात घेऊन सानपाडा ग्रामस्थांनी आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडे मागणी केली. आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नांनी हा अनेक वर्षाचा प्रश्न सोडविला गेला आहे. या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी ग्रामस्थांच्या अनेक अडचणी ऐकून घेतल्या व त्यावर लवकारच मार्ग काढणार असल्याचे सांगितले. तसेच संबंधित अडचणीवर अधिकारयांशी चर्चा झाली आहे.

भूमिपूजनसाठी सदानंद पाटील, बाळराम पाटील, सोमनाथ वस्कर, दिलीप मढवी, महेश मढवी, भार्गव मढवी, रूपेश मढवी, अंबाबाई रघु दळवी, चांगुबाई चिंतामण वास्कर, लक्ष्मी वसंत ठाकूर, सानपाडा ग्रामस्थ व पालक वर्ग तसेच अधिकारी ओमप्रकाश पवार केशव कारगुडे, ऋषीकेश कासार, दिगंबर घाडी, विजय आडबले आदी उपस्थित होते.

# आजचा निश्चय पुढचं पाऊल पुस्तिकेच्या कव्हर पेजचे प्रकाशन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ज्ञानाची आस, गुणवत्तेचा विकास, व्यवसायिकतेचा ध्यास या अनुषंगाने आजचा निश्चय पुढचं पाऊल ही ७४ पानी पुस्तिकेच्या कव्हर पेजचे प्रकाशन करण्यात असल्याचे अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांनी वाशीतील पत्रकात परिषदेत बोलताना सांगितले.

या वेळी राष्ट्रीय महिला अध्यक्ष ॲड. भारती पाटील, ठाणे जिल्हा अध्यक्ष संतोष मारूती बर्गे, श्याम ढमाले, वाशी तालुका अध्यक्ष संगीता यादव, सागर सोमनाथ काटे, सुधीर जाधव, सभाजी बर्गे आदी उपस्थित होते.

या पुस्तिकेच्या माध्यमातून क्यू आर कोडद्वारे नामवंत व्यक्तींच्या समाजाला संदेश तसेच विविध प्रकारची माहिती महासंघातर्फे पोहचवली जाणार असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.




# बाजारपेठेतही व्हॅलेन्टाईन डेचा माहोल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

व्हॅलेन्टाईन डे'चा माहोल सुरू झाला आहे. या दिवशी आपल्या आवडत्या व्यक्तीबद्दलच्या भावना व्यक्त करण्याची संधी असते. त्यामुळे हा दिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचे बेत रंगू लागले आहेत. यानिमित्ताने आठवडाभर विविध डे साजरे करण्याचे नियोजन सुरू झाले असून समाज माध्यमांवरही हृदयातील भाव ओठांवर येणाऱ्या भावस्पर्शी पोस्ट चर्चेत आल्या आहेत.

'व्हॅलेन्टाईन डे'ला गिफ्ट देण्यासाठी तरुणाईची लगबग सुरू असल्याचे चित्र आहे. पनवेलसह नवी मुंबई शहर परिसरात गुलाब फुलांची आवक वाढली असून गिफ्ट शॉपीतही युवक-युवतींची लगबग सुरू आहे. मित्र मैत्रिणीला भेटण्यासाठी, तिची किंवा त्याच्या एक झलकसाठी तरुणाईचा आटापिटा सुरू आहे. यासाठी कोणी नवीन कपडे खरेदी करत आहे, तर कोणी मित्राकडून बाईक घेऊन इम्प्रेस करण्याचा प्रयत्न करणार आहे.




महत्त्वाचे म्हणजे, एकीकडे हा आटापिटा सुरू असून दुसरीकडे व्हॅलेंटाईन डे पूर्वी होणारे रोज, प्रपोज, चॉकलेट, टेडी, प्रॉमिस डे साजरे करणाऱ्या पोस्ट व्हायरल होत आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या युगात प्रेम व्यक्त करण्यासाठी सोशल मीडियावर तरुणाई अधिक सक्रिय झाली आहे.

आपल्या आवडत्या व्यक्तीला हटके प्रपोज करावे, असे प्रत्येकाला वाटते. पूर्वी प्रेमपत्र तसेच गुलाबाचे फूल देऊन प्रेम व्यक्त होत होते. आता मात्र, आता यांत्रिक युगात प्रेमपत्राची जागा चारोळींनी घेतली आहे. त्यामुळे मोबाईलवर चित्रपटातील संवादांचा भडिमार राहणार आहे. तसेच प्रेमाची कबुली देण्याचे विविध फंडेही शोधले जात आहेत. त्यामुळे इन्स्टाग्राम, फेसबुक, स्नॅपचॅट अशा ॲप्समुळे एकमेकांच्या संपर्कात राहणे सुलभ झाले आहे. त्यामुळे प्रेमपत्र ही गोष्ट आता इतिहासजमा झाली आहे.

### व्यापाऱ्यांनी गुलाबाची आवक वाढवली

'व्हॅलेन्टाईन डे' निमित्त बाजारात आठवडाभर गुलाब भाव खातो. त्यामुळे व्यापाऱ्यांनीही गुलाबाची आवक वाढवली आहे. प्रेमाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुलाबाच्या फुलाला अधिक महत्त्व असते. सद्यस्थितीत फुलांचा आकार आणि रंगानुसार ३० फुलांची पेंडी १०० ते ११० रुपयांपासून विक्री होत आहे. तसेच लग्नसराईमुळेही गुलाबाचे दर वाढल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

# बेलापूरमध्ये माघी गणेशोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्री गणेश मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट, शिरवणे आयोजित माघी गणेशोत्सव सोहळ्याचे आयोजन मंगळवारी (दि. १३) ठाणे बेलापूर पंचक्रोशीतील पुरातन जागृत देवस्थान स्वयंभु श्री गणेश मंदिर, चिंचोली, शिरवण येथे करण्यात आले असून गणेश भक्तांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ट्रस्टचे सचिव माजी महापौर जयवंत सुतार यांनी केले आहे.

या माघी गणेशोत्सव सोहळ्यात प्राचीन आणि पुरातन श्री गणेश मंदिरात अभिषेक आणि महापूजा, सकाळी १० सुश्राव्य भजन, दुपारी महाप्रसाद, त्यानंतर पुन्हा सुश्राव्य भजन होणार आहे.

या सोहळ्याला मोठ्या संख्येने भक्तगणांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष नामदेव ठाकूर, प्रभाकर सुतार, दिलीप घरत यांनी केले आहे.

# उद्योजक विजय लोखंडे यांना उद्योगमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागातर्फे रायगड जिल्ह्यातील ४ उद्योगांना राज्य निर्यात पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये पनवेल औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष, उद्योजक विजय लोखंडे यांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते राज्य निर्यात पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार उद्योजक विजय लोखंडे आणि दिप विजय लोखंडे यांनी स्विकारला.

पुण्याच्या वाकड येथील हॉटेल टिपटॉप येथे आयोजित महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्काराचे वितरण तसेच देशातील २४ तज्ज्ञ संस्थासोबत सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, उद्योगविकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह,अपर उद्योग आयुक्त प्रकाश वायचळ, अपर उद्योग संचालक संजय कोरबु, उद्योग सह संचालक शैलेश रजपूत आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील तळोजा, पनवेल, नवी मुंबई, कामोठे येथील घटकांनाही राज्य निर्यात पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



निवडक

## रमाई जयंतीनिमित्त अभिवादन



**पाली** : बौद्ध समाज युवा संघ रायगड महिला परिवारातर्फे नेल्सन मंडेला निवासी आश्रम शाळा नागोठणे येथे रमाई जयंतीनिमित्त माता रमाई यांना वैचारिक आणि शैक्षणिक उपक्रमाने अनोखे अभिवादन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राजेश्री दाभाडे यांनी भूषविले. या वेळी अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्याध्यक्ष निलीमा जाधव, निर्मला माने, रिना ओंमकार, नशाबंदी संघटना कार्याध्यक्ष जितेंद्र मुंडकार, पोलीस इन्सपेक्टर शाम कदम, संतोष गायकवाड, भगवान बिनेदार, कोषाध्यक्ष दिपक दाभाडे, मनोहर शिंदे, संजय गायकवाड, बौद्ध समाज युवा संघ महिला परिवारामधील श्वेता मोहीते, सुनिता दाभाडे, शिक्षिका सुनीता बिनेदार, माया डोंगरावर, योजना रणवरे, सविता दाभाडे, संध्या गायकवाड, वैशाली गायकवाड, पुनम सावंत, आश्रम शाळेचे मुख्याध्यापक अंकुश कांबळे, नवनाथ डोंगरगावर उपस्थित होते.

## कोलाड महिलाध्यक्षपदी तन्वी सकपाळ



**धाटाव** : कोलाड येथील शिवनेरी मंगल कार्यालय येथे सर्व महिलांची नुकतीच बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. या वेळी कोलाड विभाग नाभिक तरुण संघटना विभागीय महिलाध्यक्षपदी तन्वी संजय सकपाळ यांची सर्वानुमते निवड झाली. उपाध्यक्ष पुजा योगेश मोहिते, सरचिटणीस साक्षी निलेश खंडागळे, खजिनदार विद्या विजय खराडे यांची निवड करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.



**नागोठणे : येथील वैदेही न्यूज पेपर एजन्सीचे मालक राजेंद्र जोशी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना जिल्हा भाजपचे माजी उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, रोहा माजी सरचिटणीस शामकांत नेरपगार, रोहा तालुका चिटणीस अनिल पवार, तालुका शिक्षण सेलचे अध्यक्ष धनराज उमाळे, सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेश पवार आदी उपस्थित होते.**

# पालीतील श्री बल्लाळेश्वर मंदिर द्राक्षाच्या तोरणांनी सजले





**सुधागड : रामप्रहर वृत्त**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीतील श्री बल्लाळेश्वराच्या माघोत्सवाच्या पार्श्वभूमिवर नाशिक येथील उद्योजक नितीन गिरासे या भाविकाकडून ५०० किलो द्राक्षापासून बनविलेले तोरण अर्पण करण्यात आले आहे. त्याद्वारे मंदिर सजावट करण्यात आली आहे.

ही सजावट आकर्षक करण्यासाठी फुले, पाने यांचादेखील वापर करण्यात आला आहे. द्राक्षाच्या तोरणाने मंदिराच्या आतील सभागृह, कमान व गाभाऱ्याची सुंदर अशी सजावट करण्यात आली आहे. ही सजावट पूर्ण करण्यासाठी तब्बल दोन दिवस लागले. ही देखणी सजावट हिमानी जेटवा, पंकज राजपूत आणि त्यांच्या १५ सहकाऱ्यांच्या मदतीने पूर्ण करण्यात आली.

द्राक्षापासून मंदिराची केलेली सजावट बघण्यासाठी भाविकांनी, पालीतील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात बल्लाळेश्वर मंदिरात गर्दी केली होती.

## भाजपतर्फे नेत्र तपासणी शिबिर
### नागरिकांचा लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद



**मुरूड : प्रतिनिधी**

भाजप मुरूड व भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांच्यामार्फत शहरासाठी भव्य नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन हिंदू बोर्डिंग येथे करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे १५० लोकांनी आपले डोळे तपासणी करून या सर्वांना मोफत चष्मे देण्यात आले.

लायन्स हेल्थ क्लबच्या डॉक्टरांनी सर्व रुग्णांना सर्वोत्तम सेवा दिली आहे. शिबिराबाबत माहिती देताना तालुका भाजप अध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांच्यामार्फत साळाव, सतिर्डे, नांदगाव, चणेरा भागात मोफत डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप कार्यक्रम ठेण्यात आले होते. त्यांच्या या लोककार्याची दखल लोक निश्चित घेतील, असा विश्चास व्यक्त केला.

**१५० लोकांची नेत्र तपासणी**

तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांनी, भाजप लोकांना जे आवश्यक आहे हे जाणून घेऊन त्याबाबतची शिबिरे राबवत असते. जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा मानून दिलीप भोईर मनापासून लोकांना लागणाऱ्या सुविधा पुरवत असल्याबद्दल त्यांनी जनतेच्या वतीने त्यांचे ऋण व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी हिंदू बोर्डिंगचे चेअरमन दिलीप जोशी, उपाध्यक्ष बाळा भगत, जनार्दन काबुकर, माजी मुख्याध्यापिका मेघा कुलकर्णी, सुरेंद्र गिरणेकर, माजी शिक्षक विजय कुलकर्णी, डॉ. गिरीश सबनीस, डॉ. हर्षद गोरे, डॉ. प्रतीक कांसे आदी उपस्थित होते.

## कर्जतच्या शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात केलेले बदल स्वागतार्ह -अंकुश माने

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरली आहे. त्यामुळे या भागात कृषी क्षेत्रातून वेगवेगळी उत्पादने घेण्यास केलेली सुरुवात क्रांतिकारक आहे. आज कर्जत तालुका प्रगतशील शेतीसाठी ओळखला जाऊ लागला आहे. हा बदल निश्चितच स्वागतार्ह असल्याची गौरवोद्गार कृषी विभागाचे कोकण विभागीय अधीक्षक संचालक अंकुश माने यांनी काढले.

तालुक्यातील प्रगतशील शेतीची पाहणी विभागीय कृषी अधीक्षक संचालकी अंकुश माने यांनी केली. शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन अंकुश माने आणि कृषी विभागाच्या अन्य अधिकाऱ्यांनी जाऊन पाहणी केली. शेतकऱ्यांना मार्गदर्श्न करताना कृषी अधीक्षक संचालक माने यांनी शेतीमध्ये केलेल्या बदलाचे कौतुक करतानाच शेतीमधून निघणारे उत्पादन याला बाजारभाव मिळवून देण्यासाठी कृषी विभाग मदत करेल, असे आश्वासन दिले आहे. कृषी अधिकारी आणि पर्यवेक्षकांनी शेतकऱ्यांना अपेक्षित असलेले मार्गदर्शन देण्यासाठी सतत शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्या पिकांची पाहणी करावी, अशी सूचनादेखील त्यांनी दिली.

विभागीय कृषी संचालक कोकण विभाग ठाणे अधिक्षक अंकुश माने, कृषि अधिकारी विभागीय कृषि संचालक, बालाजी ताटे, प्रशासन अधिकारी अधिकारी प्रफुल्ल बनसोडे, उपविभागीय कृषी अधिकारी नितीन फुलसुंदर, तालुका कृषी अधिकारी कर्जत अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी कर्जत दिनेश कोळी, मंगेश गलांडे कृषी पर्यवेक्षक नेरळ सचिन केणे कृषी पर्यवेक्षक कळंब सुदर्शन वायसे कृषी पर्यवेक्षक कर्जतश्र, दत्तू देवकाते, कृषी सहाय्यक खांडपे, राजश्री तायडे कृषी सहाय्यक दहिवली तर्फे निड, स्वाती गावडे कृषी सहाय्यक भोईरवाडी, श्रद्धा देवकर कृषी सहाय्यक पळसदरी, अनिल रुपनवर कृषी सहाय्यक कळंब तसेच लाभार्थी शेतकरी तसेच कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा प्रगतीशील शेतकरी अजित पाटील आणि विनय वेखंडे तसेच शेतकरी उपस्थित होते.



## कर्जत महाविद्यालयात अपघातग्रस्तांना वाचविण्यासाठी धडे

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल यांच्या वतीने विद्यार्थ्यांना अपघातग्रस्त व्यक्तीला उपचारासाठी रुग्णवाहिकेतून पोहचविण्यासाठी घ्यावयाची दक्षता, या विषयांतर्गत प्रात्यक्षिकासह धडे दिले.



कोकण ज्ञानपीठ कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. मोटार वाहन निरीक्षक अजय कराळे यांच्या हस्ते अभियानाचे उद्घाटन करण्यात आले होते. या वेळी डॉ. शिरीष पाटील, डॉ. जितेंद्र भामरे, डॉ. सुजाता कुळकर्णी, डॉ. गंगाधर शिंदे, डॉ. गजानन उपाध्ये आदी उपस्थित होते. प्रा. भगवान डायरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

डॉ. वाहिद यांनी प्रात्यक्षिकासह अपघातग्रस्तला पुढील उपचारासाठी नेताना घ्यावयाची काळजी याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. अजय कराळे यांनी, वाहन चालवताना आपल्या छोट्याशा चुकीमुळे आपले नुकसान होतेच, परंतु कारण नसताना अन्य वाहन चालकांना नुकसान पोहचते. वाहनांचा अतिवापर केल्यामुळे अपघात व प्रदूषण होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे वाहन कायम सुस्थितीत असावे, याची काळजी घेणे गरजेचे आहे, असे स्पष्ट केले.

## तळाशेत केंद्राचा बाल आनंद मेळावा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील तळाशेत केंद्राचा बाल आनंद मेळावा शुक्रवारी (दि.९) अतिशय उत्साहात झाला. या मेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणून आकार पॉट आर्टचे संस्थापक राजेश कुलकर्णी, आंतराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ प्रेमसागर मेस्त्री, पं. स. गटशिक्षणाधिकारी सुनिता खरात, विस्ताराधिकारी सुरेश म्हात्रे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली. केंद्रातील सर्व शाळांनी अतिशय उत्तम कलाविष्कार सादर केले. स्नेहभोजनानंतर पक्षीतज्ज्ञ प्रेमसागर मेस्त्री यांनी विविध पक्षांची व



त्यांच्या गिधाड संवर्धन प्रकल्पाबद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली.

त्यानंतर विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा पार पडल्या व नंतर मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. केंद्रप्रमुख तथा बाल आनंद मेळाव्याचे मार्गदर्शक गणेश ढेपे यांनी कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानले.

## महाडमध्ये बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करत जमिनीची विक्री
### २०२२मधील घटनेत तीन जणांना पोलीस कोठडी

**महाड : प्रतिनिधी**

चंद्रकांत बळवंत मोरे हे हिंदू-बुरुड समाजातील अल्पभूधारक शेतकरी माहिती असूनदेखील तीन जणांनी खोटी कागदपत्रे दाखवत जमीन खरेदी करीत फसवणूक केल्याची तक्रार मोरे यांनी सन २०२२मध्ये केली होती. या तक्रारीनुसार अटकपूर्व जामिनाकरता आरोपींनी धाव घेतली होती, मात्र त्यांचा जामीन फेटाळला गेल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली आहे.

मोरे यांची शेतजमीन नडगावतर्फे बिरवाडी येथे आहे. या जमिनीच्या आजूबाजूला असलेल्या जमिनीची खरेदी यापूर्वी झालेली आहे, मात्र मोरे यांची शेतजमीन मध्यभागी आणि महामार्गाजवळ असल्याने कोणत्याही किंमतीत बळकावण्याचा प्रयत्न केला. यामुळे चंद्रकांत बळवंत मोरे यांनी अनुसूचित जाती जमाती अधिनियमप्रमाणे तक्रार दाखल केली होती.

याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात फसवणूक आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. चंद्रकांत बळवंत मोरे (वय ६१, रा. देवकी अपार्टमेंट, नवेनगर महाड) यांनी या प्रकरणी फिर्याद दिलेल्या फिर्यादी नुसार सर्व्हे क्र.१११/१ मधील क्षेत्र ०५.० गुंठे आणि सर्व्हे नं.१११/२ मधील क्षेत्र ०.५४.१५ या जागेचे अखत्यार पत्र १९९२ मध्ये करण्यात आले होते. त्या अखत्यारपत्रामध्ये कोणतेही अधिकार दिलेले नसताना, तीन आरोपींनी खरेदीखत करून या जागेचा बेकायदेशीर ताबा घेतला आणि फिर्यादी यांची फसवणूक करून त्यांची जमीन बळकावली, अशी तक्रार दाखल केली होती.

## मजगाव मराठी शाळेत रंगले वार्षिक स्नेहसंमेलन

**मुरुड : प्रतिनिधी**

राजिप आदर्श मजगाव मराठी शाळेत चार दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव २०२४चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता वार्षिक स्नेहसंमेलनाने झाली. वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन युवानेते हर्षद सुबोध महाडिक व सरपंच पवित्रा चोगले यांनी केले.

या वार्षिक स्नेहसंमेलनात विविध गाणी व प्रबोधनपर विनोदी नाटकांचा समावेश होता. सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचक्रोशीतील राजकिय नेते, उद्योजक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य केल्याचे शाळेचे मुख्याध्यापक हेमकांत गोयजी यांनी आपल्या प्रास्ताविकात नमूद केले.

सुबोध महाडिक, नंदकुमार सोहनी व शैलैश काते यांनी आर्थिक सहकार्य केल्याचेही सांगितले, तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखील मानाजी, उपाध्यक्ष उमेश कोंडाजी, सदस्य योगेंद्र गोयजी, अमित कोळी, अभिनय कोळी, रूपेश अंबाजी, सरीता धसाडे, पुजा भोईर, मिथुन भोईर आदींनी सहकार्य केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षा नांदगावकर व चेतन चव्हाण यांनी केले, तर मनिषा भोईर यांनी आभार प्रदर्शन केले. प्रमिला फुंदे, रंजिता केमकर, श्रुती आयरकर, नेहा डावरे, सिद्धेश फेंगडू यांनी नृत्यदिग्दर्शन केले.





## हिरवळ महाविद्यालयात ‘वस्तू, सेवाकर’वर सेमिनार

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्समध्ये शनिवारी (दि.१०) वस्तू आणि सेवा कर (जीएसटी)बाबत माहिती देण्याच्या उद्देशाने सेमिनार आयोजित करण्यात आला.

या सेमिनारसाठी प्रमुख अतिथी असिस्टंट मॅनेजर, एचडीएफसी बँक, पोलादपूर रोहन साने हे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

रोहन साने यांनी जीएसटीचे विस्तृत माहिती दिली. त्यांनी सर्वसमावेशक पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन वापरून जीएसटी चे गुंतागुंतीचे भाग आणि कार्यरत फ्रेमवर्क यांसारख्या अनेक बाबी स्पष्ट केल्या. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) वेबसाईटच्या माध्यमातून त्यातील असणारे विविध घटक उदाहरणासहित समजावून सांगितली, तसेच वस्तू व सेवा कर कधी अमलात आणला गेला,



जीएसटी ऑनलाईन रजिस्ट्रेशन, जीएसटी फायलिंग, टॅक्स रेट्स, जीएसटी चे फायदे व तोटे, त्याची व्याप्ती याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी, जीएसटीसारख्या आधुनिक आर्थिक धोरणांचे महत्त्व जाणून विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देण्याची आणि त्यांना वास्तविक जगाच्या अडचणींसाठी सुसज्ज करण्याची महाविद्यालयाची बांधिलकी ठळकपणे मांडली व महाविद्यालयाने स्तुत्य उपक्रम आयोजित केल्याबद्दल महाविद्यालयाचे आभार व्यक्त केले. संचालिका सोनाली धारिया यांनी जीएसटीचे व्यावहारिक परिणाम स्पष्ट करण्यासाठी शैक्षणिक आणि व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांतील त्यांचे विचार मांडले.

मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी जीएसटी बद्दल त्यांचे विचार सामायिक करून आणि विविध उद्योगांमध्ये त्याचा उपयोग आणि परिणामांबद्दल विचार मांडले.

श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महाकुंभ

# शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडमी विजेते

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर व मुंबई उपनगरात श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेचा थरार वेगवेगळ्या २२ ठिकाणी सुरू असून मुंबईतील क्रीडा क्षेत्रात रविवारी (दि.११) खो-खो स्पर्धा (मुंबई उपनगर) बांद्रा येथे झाल्या. या सामन्यांमध्ये पुरुष-महिला गटाची स्पर्धा पार पडली, तर मुंबईत शिवाजी पार्क येथे सुध्दा शहरातील खो-खो स्पर्धांना सुरुवात झाली आहे.



पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पो. अकॅडमीने समता क्रीडा भवनचा १०-७ असा एक डाव ३ गुणांनी पराभव केला. या सामन्यात शिर्सेकर्सच्या निखील सोडये (२.३० मि. संरक्षण व १ गुण), रामचंद्र झोरे (१.३०, नाबाद १.५० मि. संरक्षण व २ गुण) तर समताच्या प्रथमेश दुर्गावले (१ मि. संरक्षण व १ गुण), व ज्ञानेश्वर गोवरे (१.१० मि. संरक्षण व १ गुण) यांचा खेळ उत्कृष्ट झाला, तर महिलांच्या सामन्यातसुद्धा शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पो. अकॅडमिने ओम युवा स्पो. क्लबचा ९-३ असा ६ गुणांनी विजय मिळवला. शिर्सेकर्सच्या साक्षी वाफेलकर (नाबाद १.४० मि. संरक्षण व ५ गुण), सिद्धी हिंदळेकर (नाबाद ४ मि. संरक्षण व २ गुण) तर ओम युवाच्या किंजल रजपूत (१.५०, ३.५० मि. संरक्षण), आकांक्षा त्रिभुवन (१.१०, २.२० मि. संरक्षण व १ गुण) यांची कामगिरी दमदार होती.

पुरुष गटाच्या उपांत्य सामन्यात श्री समर्थ व्या. मंदिरने अमरहिंद मंडळावर १४-७ असा ७ गुणांनी विजय साजरा केला. या सामन्यात समर्थच्या वेदांत देसाई (३.३०, १.४० मि. संरक्षण व ४ गुण), प्रणय मयेकर (२ मि. संरक्षण व २ गुण) तर अमरहिंदच्या नितीन व प्रसादने चागली कामगिरी केली. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात विद्यार्थी क्रीडा केंद्राने ओम साईश्वरवर सेवा मंडळावर ९-७ असा एक डाव २ गुणांनी विजयश्री मिळवली. विद्यार्थ्याकडून शुभम शिंदे (३ मि. संरक्षण), हर्ष कामठेकर २.३० मि. संरक्षण), पियुष काडगे (२ गुण) तर ओम साईश्वरच्या नितेश अष्टमकर (१.३० मि. संरक्षण व १ गुण), भूपेश गायकवाड आणि ओम वाटाणे (प्रत्येकी १-१ गुण) यांनी सामना गाजवला.

महिलांच्या सामन्यात शिवनेरी सेवा मंडळाने समर्थ व्या. मंदिराचा ५-२ असा एक डाव ३ गुणांनी पराभव केला. या सामन्यात शिवनेरीच्या मुस्कान शेख (५ मि. संरक्षण), ऐश्वर्या पिल्ले (४.४० मि. संरक्षण व १ गुण) यांनी तर समर्थच्या श्रीया नाईक (३.१० मि. संरक्षण) यांची कामगिरी वाखाणण्यासारखी झाली.

# रायगडच्या तायक्वांदो खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेत ११ पदके




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर, राजस्थान येथे इंडिया तायक्वांदोतर्फे आयोजित सब-ज्युनियर, कॅडेट व ज्युनियर राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा झाली. या स्पर्धेत रायगड व नवी मुंबईमधील खेळाडूंनी तीन सुवर्ण, तीन रौप्य व पाच कांस्य अशी एकूण ११ पदके पटकावून आपल्या उत्कृष्ट कामगिरीने महाराष्ट्र तायक्वांदो संघाला सांघिक विजेतेपद मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला.

यात श्रवण भोसले (२७ किलोखालील) व करण खाडे (३२ किलोखालील) यांनी सब-ज्युनियर वयोगटामध्ये तर प्रेम पाटणे (७८ किलोखालील) याने ज्युनियर वयोगटामध्ये सुवर्णपदक पटकावले. आयुष कदम (सब-ज्युनियर ४१ किलोखालील), राज जाधव, आशिष राडिये, ओमकार चव्हाण (कॅडेट सांघिक मुले) व मुस्तफा शेख (जुनियर ५१ किलोखालील) गटामध्ये रौप्यपदक पटकावले. श्रवण भोसले व स्वराली माटेकर (सब-ज्युनियर जोडी), आशिष राडिये (कॅडेट वैयक्तिक मुले), ओमकार चव्हाण व वियोना थेस्मा (कॅडेट जोडी) यांनी पुमसे प्रकारात तसेच साईराज पाटील (ज्युनियर ४५ किलोखालील) व निहाल भोईर (ज्युनियर ७३ किलोखालील) यांनी क्योरुगी प्रकारात कांस्यपदक मिळविले. चैतन्य नागने याने ज्युनियर वैयक्तिक मुले प्रकारात सहभाग नोंदविला.

या उत्कृष्ट कामगिरीसाठी इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष अनिल झोडगे, महासचिव संदीप ओंबासे, खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी, सीईओ गफ्फार पठाण तसेच अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडचे अध्यक्ष ॲड. प्रज्ञा भगत, उपाध्यक्ष संजय भोईर, सचिव सचिन माळी, खजिनदार रोहित सिनलकर व इतर सर्व पदाधिकारी, पालकांनी अभिनंदन केले.

# अश्वमेध क्रीडा महोत्सवात केबीपी कॉलेजने पटकाविले सुवर्णपदक

**नवी मुंबई : बातमीदार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे-रायगड येथे झालेल्या अश्वमेध क्रीडामहोत्सवात रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या (केबीपी) चार विद्यार्थिनी मुंबई विद्यापीठाकडून खो-खो प्रकारात सहभागी झाल्या होत्या. त्यात मुंबई विद्यापीठाला तृतीय क्रमांक प्राप्त झाला.



महाविद्यालयातील श्रद्धा शिंदे, श्वेता जाधव, साक्षी सर्जिणे आणि अपर्णा खंडागळे यांचा सहभाग मुंबईच्या खो-खो संघात होता. त्यांच्या अष्टपैलू खेळाने मुंबई संघाच्या विजयला हातभार लावला गेला. खो- खोमध्ये मुंबई विद्यापीठाच्या संघाने विजेतेपद मिळवल्याने त्यांना मुंबई संघाला सुवर्णपदक बहाल करण्यात आले.

या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी कौतुक आणि अभिनंदन केले. उपप्राचार्य प्रा. सी. डी. भोसले, डॉ. राजेश्री घोरपडे तसेच जिमखाना चेअरमन प्रा. अर्जुन पोटिंदे, क्रीडा संचालक प्रा. महादेव खाडे व जिमखाना प्रमुख प्रा. भास्कर हनवटे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा २८ फेब्रुवारीपासून

**नवी दिल्ली :** वयोगटाची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा पुढे ढकलण्यात आली असून ही स्पर्धा आता २८ फेब्रुवारीपासून पटियाला येथे होणार आहे. दोन वयोगटांतील या राष्ट्रीय स्पर्धेत १८ ते २० राज्यांचे संघ सहभागी होतील अशी माहिती बाजवा यांनी दिली.

# अलिबागमधील सेंट मेरी स्कूलच्या तीन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

शहरातील सेंट मेरी स्कूलचे विद्यार्थी तन्वी कपील कुलकर्णी, मल्हार संदेश गुंजाळ, साना सत्यजित तुळपुळे यांची सिकाई मार्शल आर्ट राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मुंबई विभाग संघात निवड झाली आहे.



१२ ते १४ जानेवारी रोजी मिरा भाईंदर, ठाणे येथे होत असलेल्या शालेय सिकाई मार्शल आर्ट राज्यस्तरीय स्पर्धा २०२४ साठी सेंट मेरी स्कूलच्या तीन विद्यार्थ्यांची निवड मुंबई विभागातून झाली. १४ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये तन्वी कपील कुलकर्णी हिचे लोबा (युद्धकला) प्रकारात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात मल्हार संदेश गुंजाळ याचे खवंके प्रकारात १७ वर्षांखालील मुलींच्या गटात साना सत्यजित तुळपुळे हिची ऐरो सिंकई प्रकारात निवड झाली आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचा मुख्याध्यापक पिका सिस्टर बेरील झेवियर आणि पी. टी. शिक्षक येतीराज पाटील, सुषमा धुमाळ सर्व शिक्षकांनी हार्दिक अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सर्व मुलांना प्रशिक्षक प्रियांका गुंजाळ, शुभम नखाते, वेदांत सुर्वे यांचे मार्गदर्शन मिळाले.





पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक स्व. संजय भोपी यांच्या संकल्पनेतून साकारलेली खांदा कॉलनी प्रीमियर लीग ४०+ म्हणजेच संजय भोपी प्रीमियर लीग ४०+ ही स्पर्धा रविवारी आयोजित करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनीही भेट दिली. या वेळी त्यांच्यासह माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, एमएसईबीचे कार्यकारी अभियंता संजय पाटील, उद्योजक संजय पाटील, भाजप खांदा कॉलनी सरचिटणीस भिमराव पोवार, दत्ता कुलकर्णी, सतीश म्हात्रे, महापालिकेचे अभियंता काजळे, रामदास गोवारी, सतीश पाटील, कामगार सेलचे मोतीराम कोळी आदी उपस्थित होते.

को-ऑपरेटीव्ह बँक एम्प्लॉईज युनियन क्रिकेट स्पर्धा

# हिंदुस्तान, रत्नागिरी बँक उपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

को-ऑपरेटीव्ह बँक एम्प्लॉईज युनियनच्या ६४व्या वर्धापनदिनानिमित्त पुरंदरे स्टेडीयममध्ये सुरू असलेल्या आंतर सहकारी बँक क्रिकेट स्पर्धेत हिंदुस्थान बँकने म्युनिसिपल बँकेचे ३७ धावांचे आव्हान पार करून ८ विकेटने विजय संपादन केला आणि उपांत्य फेरी गाठली.

हिंदुस्तान बँकेला जिंकण्यासाठी अनिकेत वाघची ३ षटकारांसह २५ धावांची आक्रमक फलंदाजी उपयुक्त ठरली. चंद्रकांत घाणेकरच्या नाबाद ४ षटकारांच्या आतषबाजीमुळे रत्नागिरी जिल्हा सहकारी बँकने जी. एस. महानगर बँकेचे ४४ धावांचे आव्हान ८ विकेटने संपुष्टात आणून उपांत्यपूर्व फेरी जिंकली.

तत्पूर्वी झालेल्या उपउपांत्यपूर्व फेरीमध्ये एनकेजीएसबी बँकेच्या ३६ धावांना यशस्वी प्रत्युत्तर देताना रत्नागिरी जिल्हा सहकारी बँक संघाने ४ विकेटच्या मोबदल्यात ३७ धावा केल्या आणि उपांत्यपूर्व फेरी गाठली.

मंत्रालय सहकारी बँकेच्या ३६ धावांचा पाठलाग करताना जीएस महानगर बँकेने ८ गडी राखून सहज विजय मिळविला. ठाणे भारत सहकारी बँकेने कुणबी सहकारी बँकेविरूद्ध प्रथम फलंदाजी करून १ बाद ६० धावा फटकाविल्या. प्रत्युत्तरात कुणबी बँकेला ३ बाद ४० धावसंख्येपर्यंत मजल गाठता आली. परिणामी ठाणे भारत सहकारी बँकेने २० धावांनी मोठा विजय मिळविला. सिटी बँकेला ५ बाद १७ धावांवर रोखून म्युनिसिपल बँकेने ९ विकेटने शानदार विजय मिळविला.

# कबड्डी स्पर्धेत आज समता वि. माणेकलाल अंतिम लढत

**मुंबई :** ज्येष्ठ क्रीडा पत्रकार स्व. आत्माराम मोरे स्मृती आंतरशालेय सुपर लीग कबड्डी स्पर्धेच्या अजिंक्यपदासाठी समता विद्यामंदिर-असल्फा विरुद्ध माणेकलाल मेहता मुंबई पब्लिक स्कूल घाटकोपर यांच्या मध्ये अंतिम लढत सोमवारी (दि.१२)सकाळी ९ वा. होईल.

आत्माराम मोरे प्रतिष्ठान व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे घाटकोपर-पश्चिम येथील माणेकलाल ग्राउंडमध्ये अँटोनियो डिसोझा हायस्कूल-भायखळा विरुध्द ताराबाई मोडक हायस्कूल-दादर यांच्यात तिसऱ्या क्रमांकासाठी सामना तत्पूर्वी होईल. स्पर्धेमधील उपांत्य सामना ताराबाई मोडक हायस्कूलचा अनिश पालेकर विरुध्द माणेकलाल मेहता स्कूलचा सामनावीर कुलदीप सिंग असा रंगला. पहिल्या डावातील २६-१४ अशा मोठ्या आघाडीचा लाभ उठवीत माणेकलाल स्कूलने ५१-३९ असा विजय संपादन करीत अंतिम फेरी गाठली.



पनवेल : भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त खानाव येथे सरपंच चषक २०२४चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत खेळाडूंना प्रोत्साहन दिले. त्यांचे आयोजकांनी स्वागत केले. या वेळी त्यांच्यासह ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे उपस्थित होते.

# इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा तारांकित फलंदाज विराट कोहलीने वैयक्तिक कारणांमुळे इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील उर्वरित सामन्यांमधून माघार घेतली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) शनिवारी संघाची घोषणा केली. त्यामुळे कोहलीच्या सहभागाबाबत चर्चा आता संपुष्टात आल्या आहेत. कोहलीने पहिल्या दोन कसोटी सामन्यांतही सहभाग नोंदवला नव्हता.

विराट कोहली वैयक्तिक कारणांमुळे उर्वरित सामन्यांच्या निवडीसाठी उपलब्ध नसेल. बीसीसीआय कोहलीच्या या निर्णयाचा आदर करते, असे बीसीसीआयने आपल्या निवेदनात म्हटले आहे. कोहली सध्या कौटुंबिक कारणांसाठी विदेशात असल्याचे समजते आहे.

सध्या पाच सामन्यांची कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. तिसरा कसोटी सामना १५ फेब्रुवारीपासून राजकोट येथे सुरू होणार आहे. वैयक्तिक कारणांमुळे कोहली अनुपलब्ध राहणार असल्याची कल्पना बीसीसीआयला होती, मात्र ७ ते ११ मार्चदरम्यान धरमशाला येथे होणाऱ्या अखेरच्या कसोटीसाठी तो उपलब्ध होईल का याची चाचपणी बीसीसीआयकडून केली जात होती, पण त्यांच्या पदरी निराशा आली.

**असा आहे भारतीय संघ :**

रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमरा (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, केएल राहुल, रजत पाटीदार, सर्फराज खान, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), केएस भरत (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, आकाश दीप.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com